
शनिवार । ९ फेब्रुवारी १९८० । ७५ पैसे

# माणूस

## बार्शी

श्री. ग. मा.



पूर्वी ज्याला बोधवाद म्हणत असत त्याला हल्ली प्रबोधन किंवा बांधिलकी असे म्हटले जाते. या प्रकारच्या साहित्याचा गौरव बार्शी येथे भरलेल्या ५४ व्या मराठी साहित्य संमेलनात व्हावा, हे अपेक्षितच होते. कारण संमेलनाध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांनी आपल्या ग्रंथांच्या द्वारे किंवा भाषणातून बोधवादी किंवा प्रबोधनवादी साहित्याचा पुरस्कार गेली अनेक वर्षे सातत्याने केलेला आहे. त्यांचे आजवरचे सर्व विचार त्यांच्या यावेळच्या अध्यक्षीय भाषणातून प्रतिबिंबित व्हावेत हे साहजिकच होते. संतसाहित्य हे वास्तविक पूर्णतः आत्मनिष्ठ व केवळ स्वान्तः सुखाय लिहिले गेलेले. एकनाथ-रामदासांनी त्यावेळचा समाज डोळ्यासमोर ठेवून थोड्या तरी रचना केलेल्या आहेत; पण ज्ञानेश्वर-तुकाराम तर अध्यात्माचा, स्वान्तःसुखवादाचा कळसच; पण हा कळससुद्धा सरदारांनी 'सामाजिक फलश्रुती'-वादाच्या दृष्टिकोनातून पाहिला. हे पूर्वीचे पाहणे आणि यंदा बार्शी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी दिलेली प्रबोधनाची हाक, यात एक सुसंगती आहे. सतत ते गेली पंचवीस-तीस वर्षे जे सांगत आले त्याचीच ही एक उजळणी आहे. शब्द बदलले तरी मुख्य भूमिका पूर्वीचीच आहे. मग चर्चेतही नाविन्य कुठून येणार? बांधिलकी म्हणा किंवा बोधवाद म्हणा, अर्थ एकच निघतो. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध हाच काय तो वादविषय आहे. साहित्यिक हा समाजाशी बांधलेला आहे की, स्वतःच्या हस्तीदंती मनोऱ्यात रममाण होणारा, मानससरोवरात विहरणारा तो एक मुक्त प्राणी आहे? सरदारांची विचारसरणी सर्वसमावेशक असल्याने त्यांनी या दोन्ही भूमिकांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्यिक हा समाजाचा घटक आहे हे खरेच आहे. तो स्वतंत्र असला पाहिजे, त्याच्यावर कसलेही-कुणाचेही बंधन असता कामा नये, हेही खरेच आहे. मग एखाद्याला समाजाऐवजी पशुपक्षादिकांच्या जीवनातच रस असला

मुखपृष्ठ २ वर

मुखपृष्ठ १ वरून....

आणि त्याने या क्षेत्रात काही साहित्य-कृती निर्माण केली तर तिचे स्थान कसे ठरवायचे? उत्कटतेने अनुभव घेणे आणि तो सुंदर व प्रभावी शब्दात व्यक्त करणे, हा साहित्यिकाचा स्वभावधर्म. ही उत्कटता सामाजिक विषयांबद्दलच असावी किंवा असते असे नाही. बाल-कवींच्या कवितांमध्ये सामाजिकता नाही. केशवसुतानी 'तुतारी' फुंकली तसेच 'सतारीचे बोल' ही ऐकवले. एकीत सामाजिकता ओतप्रोत आहे तर दुसरी कमालीची आत्मनिष्ठ. इसाप-नीती आणि पंचतंत्र यांना आपण साहित्य मानणार की नाही? या गोष्टी कोणी, केव्हा, कशासाठी लिहिल्या, तो काळ कोणता, त्यावेळच्या समाजाचे प्रश्न कोणते, याबद्दलचा काहीही उल-गडा या गोष्टी वाचताना होत नाही. या गोष्टीत प्रबोधकता निश्चितच आहे पण बांधिलकी दिसत नाही. त्यावेळी 'समाज' नसावाच, सगळीकडे पशुपक्षी आणि प्राणी यांचे राज्य असावे, असेही या गोष्टी वाच-ताना वाटून जाते. मग हे श्रेष्ठ साहित्य मानायचे की नाही ? बोधवादात, बांधिलकी संप्रदायात याचे उत्तर साप-डत नाही. या व अशा अनेक गुंता-गुंतीच्या व साहित्यनिर्मितीच्या मूळ गाभ्याला स्पर्श करणाऱ्या प्रश्नाच्या उत्तरासाठी म्हणूनच आपल्याला सर-दारांच्या समन्वयवादापलीकडे जाणाऱ्या दुसऱ्या एका भाषणाची मदत घ्यावी लागते. हे भाषण या संमेलनाचे उद्घाटक शिवराम कारंथ यांचे. सरदारांचे भाषण हे एका थोर शिक्ष-काचे, समीक्षकाचे भाषण आहे. शिव-राम कारंथ यांचे भाषण हे एका सर्जनशील साहित्यिकाचे भाषण आहे. कारंथांनीही सामाजिकता, बांधिलकी वगैरे नाकारली नाही पण साहित्यिक कशा अर्थाने समाजाशी, निसर्गाशी, सभोवतालशी बांधलेला असतो, याचा उलगडा त्यांच्या भाषणावरून अधिक होतो. साहित्य संमेलने अशा भाषणांनी, स्वानुभवकथनांनी खरी तर गाजायला हवीत. त्याऐवजी ती बऱ्याचदा सामाजिक-राजकीय प्रश्नां-नीच गाजतात किंवा उधळली जातात. अगदी बार्शीचे संमेलनही, सरदारां-सारखा पुरोगामी अध्यक्ष असताही उधळले जाण्याच्या बेतात आले होते. पण राज्याचे गृहराज्यमंत्री भाई वैद्य आपल्या फौजफाट्यानिशी हजर होते. सरदारांसारखा सर्वांना सांभाळून घेणारा व सर्वांना आदरस्थानी अस-णारा अध्यक्ष लाभलेला होता. त्यामुळे थोडी गडबड उडाली तरी संमेलन उधळले वगैरे गेले नाही. मराठवाडा विद्यापीठ नामांतर व्हायला हवे म्हणून जे संमेलनावर बहिष्कार टाकू पाहात होते, ज्यांनी यासाठी संमेलनावर मोर्चे आणले त्यांनी सरदारांच्या व कारंथ यांच्या भाषणांचा तरी थोडा विचार करावा. असे आत्मपरीक्षण वेळीच केले नाही तर श्रेष्ठ दर्जाची आत्मनिर्भरता सोडाच, व्यापक सामाजिकताही अशा बहिष्कारातून,मोर्चातून, साहित्यातूनही कमीकमी होत जाईल आणि उरेल तो केवळ गोंगाट असेल. विद्रोहाची धार केव्हा तरी मुख्यप्रवाहाशी जोडली जावी लागते. यामुळे विद्रोह सफल होतो व मुख्य प्रवाह पुढे वाहत राहतो. यालाच संगम म्हणतात. समन्वया-पलीकडची ही स्थिती असते. समन्वयात


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : सदतिसावा
९ फेब्रुवारी १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

द्वैत उरतेच. संगम हा अद्वैताचा अनुभव असतो. जे अद्वैताचा अनुभव घडवते ते श्रेष्ठ साहित्य—दुसरे काय ? असा अनुभव संत साहित्य देते म्हणून सातसातशे वर्षे ज्ञानेश्वरीचा प्रभाव कायम राहतो, बुडवलेल्या तुकारामाच्या गाथाही पुन्हा वर येतच राहतात. कुणीही चौकशी करीत नाही, तुकारामाची जात कोणती होती आणि ज्ञानेश्वरांची बांधिलकी कुणाशी? हा सगळा वारसा दलित साहित्यात नाकारला जाणार असेल तर नुकसान ज्ञानेश्वर–तुकारामांचे नाही, आपले आहे, मराठी साहित्याचे आहे, दलित साहित्याचे तर आहेच आहे. कारण ते आपला जीवनरसच मग कुठून घेणार आहे ? असा जीवनरसाचा पुरवठा होत राहिला नाही तर ते खुरटल्याशिवाय कसे राहील ? आताच ही स्थिती येऊ लागलेली आहे. सरदारांसारखे अध्यक्षमित्र दलित साहित्याला या जीवनरसाशी त्याने मांडलेले शत्रुत्व सोडायला प्रवृत्त करू शकले तरी हा बार्शीचा सोहोळा यशस्वी ठरला असे मानता येईल. पुढचे पुढे. □

# सप्रेम नमस्कार

□ आपले प्रतिनिधी श्री. चंद्रकांत दीक्षित याचा तळोजा प्रकरणी लेख चांगला उतरला आहे; परंतु त्यात एक-दोन महत्त्वाच्या चुका झाल्यात.

श्री. वामनराव साळुंखे यांनी पिस्तूल हस्तगत केले त्या वेळी त्यांच्याबरोबर कामगार कार्यकर्ते श्री. मोकल होते. आत गेल्यावर श्री. दीक्षित (मालकांपैकी एक) यांना श्री. मोकल यानी पाठीमागून मिठी मारली व श्री. साळुखे यांनी त्यांचे हातातील पिस्तूल काढून घेतले. त्या वेळी ते काळेठिक्कर पडले नव्हते. घटनाप्रसंगी मी तेथे दिवसभर होतो. दुसरे म्हणजे 'घाटकोपरहून श्री. दीक्षित (मालक) यांचे मोठे भाऊ येताना त्यांना काही कल्पना नव्हती' हेही विधान चुकीचे वाटते. त्याच्या धाकट्या भावाने रात्रीच फोन करून त्यांना दि. १४ चे प्रकाराबाबत कळविले असावे व म्हणूनच ते पनवेल-तळोजा येथे येताना आपलेकडील पिस्तूल लोड करून आले असावे. जरी परवाना असला तरी प्रत्येक वेळी कारखान्यात येताना पिस्तूल लोड केलेले ते घेऊन येत होते काय ? हाही प्रश्न आहे.

दि. १४-१ रोजी श्री. साळुंखे यांनी कामगारांची तक्रार स्वीकारली नाही. जरी त्यांचे शिपायाने अगोदरच तक्रार नोंदविली होती तरी दुसरी तक्रार स्वीकारण्यास काहीच हरकत नव्हती असे वाटते. या दिवशीच रात्री पोलिसांनी अधिक दक्षता घ्यावयास हवी होती. ते कार्य श्री. साळुंखे यांनी पार पाडले नाही, म्हणूनच सर्व प्रकरण पेटत गेले असे वाटते. असो.

३० जानेवारी ८० — प र. हुंद्रे
पनवेल

□ आपला शनिवार दि. १९-१-८० च्या 'माणूस'मधील 'सावधान-दक्ष' हा लेख वाचला. त्यात आपण श्री. मोरारजी देसाई यांच्या स्वतःच्या शिवांबू प्राशनाबद्दल बरीच टीका केली आहे. श्री. देसाई यानी पंतप्रधानपद समर्थपणे सांभाळले. परदेशीही प्रवास केला. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीनिमित्ताने देशभर दौरा केला, पण कधी क्वचितच आजारी पडले. मोरारजीना दवाखान्यात दाखल केले व लोक त्यांना भेटायला जाऊ लागले असे कधी घडले नाही. त्यांच्या या अथक परिश्रमाचे रहस्य काय ? ते हे सर्व कसे करू शकले ? अर्थात त्यांना तितकी शक्ती असली पाहिजे व शक्य आहे की, ही शक्ती व हे आरोग्य त्यांना त्यांच्या नियमित शिवांबू प्राशनाने प्राप्त झाली असली पाहिजे. याबाबतीत त्यांचा अनुभव मानायलाच हवा. एकदा एका पत्रकारपरिषदेत काही परदेशी वार्ताहरांनी त्याच्या शिवांबू प्राशनाची टिंगल करायला सुरुवात करताच मोरारजीनी त्यांना चांगलेच चापले व पत्रकाराना गप्प बसावे लागले.

माझ्या वाचनात आले आहे की, कोल्हापूर येथे या चिकित्सेचा बराच उपयोग केला जात आहे. तेथील डॉक्टरलोक त्याच्या पेशंटस्ना शिवांबूची चिकित्सा सांगतात व त्या रोग्यांना त्याचा चांगला उपयोग होतो. शक्यता आहे की, कोल्हापूरला आपले काही डॉक्टर मित्र असतील नसल्यास तेथील एखाद्या डॉक्टरशी संपर्क साधून, या चिकित्सेबद्दल चौकशी करावी. माझा विश्वास आहे की, आपल्याला निश्चित काही तरी उपयुक्त माहिती मिळेल. तेथील डॉक्टरांनी कोणत्या व्याधीवर काय उपचार केले व त्याचा परिणाम काय झाला हेही कळेल. तरी आपण अवश्य प्रयत्न करावा, अशी आग्रहाची विनंती आहे.

२५ जानेवारी ८० — स. वा. वैशंपायन
डोंबिवली

श्री. स. वा. वैशंपायन यांस सप्रेम नमस्कार,

माझ्या लेखातील शिवांबूविरोधी उल्लेखाबद्दल आक्षेप घेणारे आपले पत्र पोचले. या विषयाबद्दल अनेकांचे गैरसमज आहेत कारण कुठल्याही विषयाचा निर्णय घेण्याकरता 'शास्त्रीय पद्धती' आपण बहुसंख्य लोक

वापरत नाही. पद्धती थोडक्यात सांगतो.

एखाद्या चिकित्सेचा एखाद्या व्याधीवर उपयोग होतो हे सिद्ध करण्याकरता काही कसोट्या असतात. त्या अशा– १) मोठ्या संख्येत, शेकडो, शक्य झाल्यास हजारो रुग्णांवर प्रयोग करणे. २) Controlled Trials. म्हणजे त्याच वेळी, तितक्याच रुग्णांवर, placebo म्हणजे औषध नसणारे पण तसेच दिसणारे कल्प वापरणे. ३) Matched Groups. म्हणजे औषध व placebo दिले जाणारे गट वय, लिंग, पोषण, आहार, श्रम, वातावरण इ. बाबतीत शक्य तो समान असावेत ४) Double blind Trials. म्हणजे कोणत्या गटाला औषध व कोणत्या गटाला placebo हे रुग्णांना माहीत नसावे, तसेच रुग्णांचे वरील परिणामांची नोंद ठेवणाऱ्या डॉक्टरलाही माहीत नसावे.

अशा तऱ्हेने चाचण्या शिवाबूबद्दल घेतल्यास व त्यात Statistically significant इतक्या फरकाने त्याचा उपयोग सिद्ध झाल्यास मी ही चिकित्सा अवश्य मान्य करीन. एकट्या मोरारजीच्या उदाहरणाला शास्त्रीयदृष्ट्या कवडीचीही किंमत नाही. मग भले ते पंतप्रधानपद उत्तम सांभाळोत, की १०० वर्षे निरोगी जगोत! मंत्राने सापाचे विष उतरवणे, कावीळ बरी करणे, कुठल्या तरी गुप्त देशी औषधाने नारू किंवा जलोदर वा कावीळ बरी करणे असले नेहमी ऐकण्यात येणारे रामबाण उपायसुद्धा वरील कसोटीवर उतरत नाहीत तोपर्यंत मान्य करता येणार नाहीत. कोल्हापूरच्या डॉक्टरांनी असे प्रयोग केले असल्यास त्याचा अहवाल अवश्य वैद्यकीय नियतकालिकात प्रसिद्ध करावा.

मी स्वत: माझ्या रुग्णालयात असे प्रयोग केले. (४,५ रुग्णांवर) त्याचा निष्कर्ष असा. किडनीचे काम जोपर्यंत normal असते, तोपर्यंत शरीरातला टाकाऊ भागच त्यातून बाहेर पडतो. तो पुन्हा शरीरात सोडला तर पुन्हा बाहेर टाकला जाईल. फक्त मूत्रविसर्जनाचे प्रमाण वाढेल. काही रोगात शरीराला उपयोगी पडणारा भाग मूत्राद्वारे बाहेर टाकला जातो. उदा Albumin, sugar हे पदार्थ. तसेच काही वेळा मूत्रनिर्मिती कमी पडते. (Oliguria) अशा वेळी या पदार्थांचे Recycling झाल्यामुळे त्यांचा शरीराला उपयोग होतो व मूत्रातील urea या घटकामुळे मूत्रप्रवृत्ती वाढते. पण हे सर्व घडवणारी आधुनिक औषधे उपलब्ध असताना हा द्राविडी प्राणायाम निरर्थक ठरतो.

माझ्या एका मित्राचा Chronik colitis हा किचकट विकार शिवाबू चिकित्सेने पूर्ण बरा झाला. पण हे एकमेव उदाहरण. निदान असे १०–१५ रुग्ण बरे व्हायला हवेत.

मुंबईला वैद्यकीय तज्ज्ञांच्या एका परिषदेत मी शिवांबूबद्दल प्रश्न विचारला होता. त्याला उत्तर मिळाले– 'आजकाल या विषयावर बोलणारांची आणि एकापेक्षा एक सुरस आणि चमत्कारिक हकीगती सांगणारांची लाट आलेली दिसते. उद्या एखादा शिवांबूतज्ज्ञ असेही सांगेल की, 'एक रुग्ण मेला; पण त्याला कॅथेटर करून आम्ही त्याची लघवी काढली आणि शिरेवाटे त्याच्या शरीरात टोचली. त्याबरोबर तो जिवंत झाला!' मूत्र ही गोष्ट जर शरीराला इतकी उपकारक असती तर निसर्गाकडून ती शरीराबाहेर टाकण्याची व्यवस्था निर्माण तरी कशाला झाली असती? उलट ज्याच्या शरीरात, मूत्रप्रवृत्ती कमी पडून त्यातील द्रव्ये रक्तात भिनत राहतात, (मोरारजीच्या तोडीस तोड उदाहरण पाहिजे असल्यास जयप्रकाश) त्याला तातडीचे उपचार न केल्यास तो प्राणास मुकतो. अशा रुग्णांची प्रकृती मोरारजीच्यासारखीच– तेज:पुंज, टवटवीत दिसायला हवी! तेव्हा शिवाबू वगैरे सर्व बकवास आहे.'

मलपृष्ठ १ वर




लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# सिंग अटक प्रकरण

## 'किस्सा कुर्सीका' प्रकरणातील नवा किस्सा

वा. दा. रानडे

'किस्सा कुर्सी'का प्रकरणाचा तपास करणारे केंद्रीय गुप्तचर विभागाचे अधिकारी के. एन्. सिंग यांच्या अटक प्रकरणाने आणीबाणीच्या दिवसांची आठवण करून दिली. राज्यसभेत या प्रश्नावर झालेल्या चर्चेत विरोधी पक्ष सभासदानी सिंग यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली आणि 'आम्ही सूडाने वागणार नाही' हे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात पाळले जाणार आहे का याबद्दल शंका प्रदर्शित केली. या प्रकरणी राज्यसभेत झालेली चर्चा वृत्तपत्रात सविस्तर येऊन गेलेलीच आहे. तिची पुनरुक्ती न करता या प्रकरणातून कोणते प्रश्न उपस्थित होतात व त्याची समाधानकारक उत्तरे सरकार देणार आहे का याकडे लक्ष वेधावयाचे आहे.

पहिला प्रश्न सिंग यांना अटक झाली की नाही? सिंग याना अटक झालेली नाही; त्याना जबाबासाठी नेण्यात आले असे केन्द्रीय गृहमंत्री झैलसिंग यानी राज्यसभेत सांगितले. कायद्याचे काटेकोर परिभाषेत 'अटक' 'ताब्यात घेणे', 'घेऊन जाणे' असे शाब्दिक श्लेष काढता येतील; पण याबाबत राज्यसभेत विरोधी पक्षाचे सभासदांनी सागितलेली माहिती, वृत्तपत्रानी दिलेल्या बातम्या आणि स्वत: सिंग यानी सागितलेली माहिती लक्षात घेता झैलसिंग याच्या उत्तराने समाधान होत नाही. सिंग यांना अटक केलेली नव्हती तर मग त्यांची जामिनावर सुटका होते याचा अर्थ काय? अटक झालेल्या माणसाकडूनच मुक्ततेसाठी जामीन घेतला जातो. सिंग यांना जबाबासाठी नेले होते तर मग त्यांच्याकडून जामीन घेण्याची काय आवश्यकता होती? मंत्र्याच्या उत्तरावरून याचा उलगडा होत नाही. अटक टाळण्यासाठी अटकपूर्व जामिनाची तरतूद आता कायद्यात करण्यात आली आहे. ज्याला अटकेचा संभव वाटतो त्या व्यक्तीनेच यासाठी अर्ज करावयाचा असतो. सिंग यानी तसा अर्ज १ फेब्रुवारीस म्हणजे हे प्रकरण घडल्यावर तीन दिवसानी केला. कारण आपणास अटक होणार आहे किंवा जबाबासाठी घेऊन जाणार आहेत याची सिंग यांना आधी काहीही कल्पना नव्हती. २९ जानेवारीला सकाळी साडेसहा वाजता पोलिस त्याच्या घरी आले व एका जबाबासाठी त्यांना घेऊन गेले.

स्वतः सिंग यांनी आपल्या जीवितास धोका वाटतो व आपणास संरक्षण मिळावे अशी विनंती करणारी पत्रे गृहखात्याचे सचिव आणि केन्द्रीय गुप्तचर विभागाचे संचालकाना पाठविली आहेत. या पत्रात ते लिहितात, "माझ्या अटकेमागे दुष्ट हेतु असून वार्ताहर जर त्यावेळी उपस्थित नसते तर गुरगावमध्ये मला गंभीर शारीरिक इजा झाली असती. माझा जबाबच तुम्हाला हवा आहे ना? मग तो आता, येथे घरीच नोंदवा" असे सिंग यांनी वार्ताहराच्या व केन्द्रीय गुप्तचर विभागाच्या सयुक्त संचालकासमक्ष पोलिसाना सांगितले होते. पण तुमचा जबाब पोलिस ठाण्यावरच नोंदवावा लागेल असा आग्रह पोलिस अधिकाऱ्यांनी धरला. तुम्हाला तसे करायचे असेल तर कायद्याप्रमाणे तुम्ही मला नोटीस दिली पाहिजे आणि जबाबासाठी मी कोणत्या दिवशी केव्हा हजर रहावयाला हवे ते आधी कळविले पाहिजे म्हणजे मी त्या दिवशी हजर होईन असे सिंग यानी सागितले. पण तशी नोटीस देण्याचे नाकारून पोलिस अधिकारी सिंग याना गुरगावला जबरदस्तीने घेऊन गेला. केन्द्रीय गुप्तचर विभागाचे एक अधिकारी के. पी. सिंग यानी हा सारा प्रकार स्वत: पाहिला. एन्. के. सिंग याना शारीरिक इजा केली जाण्याचा संभव आहे असे के. पी. सिंग यांना वाटले म्हणून पोलिसाच्या मागोमाग ते गुरगावला गेले. पोलिस ठाण्यावर ते थाबले होते. एन्. के. सिंग याच्या वैयक्तिक जातमुचलक्याच्या अर्जावर साक्षीदार म्हणून त्यानी सही केली आहे. या साऱ्या घडलेल्या गोष्टी प्रतिज्ञापत्रावर (अॅफिडेव्हिट) सागण्याची त्यांची तयारी आहे.

पोलिस अधिकारी सिंग यांना जबरदस्तीने घरातून घेऊन गेले याचा कोणीही इन्कार केलेला नाही. हे सारे प्रकरण आताच का व कसे उद्भवले? मारूती मोटार कंपनीतील एक टेंपो ड्रायव्हर रामचंदर यांच्या पुतण्याने मे १९७७ मध्ये गुरगाव पोलीस ठाण्यावर एक तक्रार नोंदविली होती. किस्सा कुर्सी प्रकरणाच्या तपासात रामचंदर याचा जबाब घेण्यासाठी केंद्रीय गुप्तचर विभागाच्या दोन इन्स्पेक्टरांनी रामचंदरला एन. के. सिंग यांच्या सागण्यावरून पळवून नेले होते असा

आरोप त्यात केलेला होता. या संबंधात जबाबासाठी पोलिस आता सिंग याना घेऊन गेले होते. दिल्लीचे डिस्ट्रिक्ट व सेशन्स-जज्जांनी दिलेल्या एका निकालाचा आधार देऊन आपल्यावर करण्यात आलेले आरोप खोटे आहेत असे सिंग यानी म्हटले आहे. वास्तविक ज्या दोन इन्स्पेक्टरांनी रामचंदर याला पळवून नेल्याचा आरोप आहे त्यांच्या बाबतीत पोलिसांनी काहीच कारवाई केलेली नाही. सिंग अटक प्रकरणाने केंद्रीय गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यात घबराट निर्माण झाली असून रामचंदरला पळवून नेल्याचा आरोप असलेले दोन इन्स्पेक्टर भूमिगत झाले असल्याची बातमी आहे. सिंग याच्या अटकेचा निषेध करणारे निवेदन दोनशे अधिकाऱ्यांनी केंद्रीय गुप्तचर विभागाच्या संचालकांना सादर केले. आपले कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्याचा असा छळ होत असेल तर तपासाची जबाबदारीची कामे स्वीकारायला अधिकारी पुढे येणार नाहीत.'

किस्सा कुर्सीका खटल्यात सरकारी वकील म्हणून राम जेठमलानी काम पहात होते. नवे सरकार आल्याबरोबर त्यानी वकील बदलला व श्री. जोगिंदरसिंग बासू याना आपले वकील नेमले. जोगिंदरसिंग पंजाबचे माजी अॅडव्होकेट जनरल असून बादल सरकारने झैलसिंग यांच्यावरील आरोपांच्या चौकशीसाठी नेमलेल्या कमिशनपुढे झैलसिंग याची बाजू त्यानी मांडली होती. एन. के. सिंग यानी रजेवर जावे असे त्यांना सुचविण्यात आले होते; पण सुप्रीम कोर्टात किस्सा कुर्सी खटला निर्णायक टप्प्याला आला असता आपण रजेवर जाणे बरोबर नाही असे सिंग याना वाटले. सुप्रीम कोर्टात बचावाची बाजू माडण्याचे काम जवळजवळ संपत आले व त्यात उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्याला उत्तर देणारी सरकारी बाजू तयार करण्यास जेठमलानी यांनी सुरुवात केलेली होती. तेच काम आता जोगिंदरसिंग बासू करणार असल्याने त्यांना या कामी आवश्यक ते टिपण सिंग तयार करू लागले होते, पण अटक प्रकरणाने त्यांना आता रजेवर जाणे भाग पडले आहे.

सुप्रीम कोर्टात किस्सा कुर्सीका खटल्याची सुनावणी चालू असता त्याचा तपास करणारे अधिकारी सिंग यांना अशा प्रकारे वागविले जाणे याला 'अयोग्य' हा शब्द वापरणे फारच सौम्य होईल. एखादे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना त्यावर मतप्रदर्शन करता येत नाही. या प्रकरणी सुप्रीम कोर्ट काय निकाल द्यावयाचा तो देईलच; पण केंद्रीय गुप्तचर विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांना अशा पद्धतीने वागविण्यात येणार असेल तर गुन्ह्याच्या तपासाचे काम करण्यास अधिकारी मिळणेच कठीण जाईल. गुन्ह्याचा तपास ही न्यायदानाच्या प्रक्रियेतील पहिली पायरी. तीच कच्ची राहिली तर आपणास न्याय मिळेल अशी आशा सामान्य माणसाने कशाच्या आधारावर बाळगावयाची ?

सिंग यांना अटक करू नका अशा सूचना पंतप्रधान श्रीमती गांधींनी दिल्याने त्याना अटक झाली नाही; पण जबरदस्तीने त्याना घरातून घेऊन जाऊन त्याचा जबाब घेतला गेला ते कोणाच्या सूचनेवरून झाले ? संजय गांधींचा यामागे हात असावा अशी शंका गुजरातचे मुख्यमंत्री बाबूभाई पटेल यांनी व्यक्त केली. निश्चित पुराव्याशिवाय या बाबत कोणताही आरोप करणे योग्य होणार नाही; पण इंदिरा गांधींना काही माहिती नसता हा सारा प्रकार घडला असेल तर जुन्या चौकडीच्याच हाती पुन: सूत्रे जाऊ लागली आहेत काय अशी शंका येण्यासारख्या या घटना आहेत.

सिंग याना न्याय मिळेल आणि अशा पद्धतीने अधिकाऱ्याना वागविले जाणार नाही असे स्पष्ट आश्वासन सरकारकडून मिळायला हवे. □


**मान्यता पावलेला चरित्रग्रंथ**

# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## अपूर्व परिस्थितीतील व्याख्यान

समय सायंकाळचा, स्थळ—सारस बाग, पुणे.

सारसबागेतल्या गणेश मंदिराच्या झाडीवर असंख्य पक्ष्यांचा किलबिलाट चालू आहे. कावळे, चिमण्या, बगळे, पोपट, साळुंक्या, घारी, नाना तऱ्हेचे पक्षी चहू दिशेने झाडीकडे येत आहे. तसेच खाली भक्तही चहूकडून मंदिराकडे येत आहेत. क्षणाक्षणाला प्रवेशद्वारांवरील घंटा वाजत आहे. भक्त आपापसात बोलत आहेत. वरच्या झाडीतल्या पक्ष्यांचा कलकलाट व खाली भक्तांचा कलहाट या दोहोत प्रसिद्ध इतिहाससंशोधक डॉ. सेतू माधवराव पगडी व्याख्यानाला उभे राहिले. वक्ता उभा राहिला की, तो साधारणतः सभा स्तब्ध होण्यास मिनिट अर्धमिनिट वेळ देतो. तेवढ्या वेळात हळूहळू सभा शांत होते. पण इथे वक्ता थांबवणार कुणाला ? पक्ष्यांचा किलबिलाट थांबवणे अशक्य. तेवढाच भक्तांचा कलहाट थांवविणे अशक्य आणि समोर तर भाषणाच्या अपेक्षेने दोन-तीनशे श्रोते बसलेले. म्हणूनच भाषणास आरंभ करिताना सेतू माधवराव पगडी म्हणाले,

'मित्रहो ! ही अपूर्व परिस्थिती आहे. भाषण गजाननासमोर, जिथे अनेक ऐतिहासिक प्रसंग घडले, अशा सारसबागेतील गणपतीसमोर. माझे लक्ष भाषणाकडे आणि भक्तांकडे. भक्तांचे लक्ष गजाननाकडे आणि माझ्याकडे, ही अपूर्वच परिस्थिती. आम्ही बंदिस्त हॉलला सरावलेले वक्ते. ही इथली परिस्थिती अपूर्व असली तरी ते आव्हान स्वीकारलेच पाहिजे.'

असे प्रास्तविक करून सेतू माधवराव पगडी यांनी 'नाना फडणीस व महादजी शिंदे.' या त्या दिवशीच्या आपल्या विषयावर बोलण्यास सुरुवात केली. दीड-दोन तास त्यांनी सुंदर व्याख्यान दिले. आव्हान स्वीकारून भक्तांची गजबज किंवा पक्ष्यांची किलबिल याला दाद दिली नाही.

पर्वती संस्थानांतर्गत सारसबाग येथे श्रीसिद्धिविनायक देवतेचा पाच दिवसांचा वार्षिक उत्सव होता. उत्सवातील चौथ्या दिवशी म्हणजे दिनांक २१-१-८० ला सायंकाळी सहा वाजता, गजाननासमोर पगडी यांचे व्याख्यान झाले.

व्याख्यानाआधी वक्त्याची ओळख करून देताना, श्री देवदेवेश्वर पर्वती संस्थानाचे सरपंच, श्री. प. वि. उर्फ भाऊसाहेब पटवर्धन म्हणाले, 'आज सारस बाग श्री सिद्धिविनायक देवतेच्या वार्षिक उत्सवाचा चौथा दिवस गेले तीन दिवस अनेकविध कार्यक्रम झाले. पहाटे महापूजा, महाभिषेक, सर्वारिष्टशांतीकरिता गणेशयाग वगैरे. आम्हा विश्वस्तांची भूमिका अशी आहे की इथे धार्मिक कार्यक्रमाबरोबर समाजप्रबोधनही व्हावे. अशा मंडळींना आम्ही येथे बोलावतो व तेही आम्हाला त्यांच्या ज्ञानाचा लाभ देऊन, श्रीची सेवा साधतात. आज प्रख्यात पंडित डॉ. सेतू माधवराव पगडी येथे आले आहेत, त्यांचे स्वागत करितो.'

नंतर भाऊसाहेब पटवर्धन यांनी डॉ. पगडी यांची, इतिहाससंशोधक, उर्दू व पर्शियन भाषेवर प्रभुत्व असलेले, मोंगल व मराठे, शिवछत्रपतींचे चरित्र, सुफी पंथाचा इतिहास, सेतुबंधन वगैरे ग्रंथांचे कर्ते म्हणून ओळख करून दिली.

□

वर्षापूर्वी मी 'संध्याकाळचे पुणे' सदर सुरू केले तेव्हा पहिला लेख इतिहास संशोधन मंदिर येथील कार्यक्रमावर व दुसरा सारसबागेतील याच वार्षिक उत्सवावर लिहिला होता. त्या वेळी मी पुनर्रचना केलेल्या या श्रीसिद्धिविनायकाच्या मंदिराचे वर्णन केले होते. आता माझ्या हाती आलेल्या व १९७७ साली प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेतून या मंदिराचा थोडासा इतिहास देत आहे.

पर्वती टेकडीच्या माथ्यावरील श्री. देवदेवेश्वर मंदिर आदिकरून वास्तू पूर्ण झाल्यावर नानासाहेब पेशवे यांचे लक्ष पर्वती टेकडीचा परिसर सुधारण्याकडे गेले. त्यांनी पर्वतीच्या पायथ्याशी अंबील ओढयाच्या सीमेवर एक कृत्रिम तलाव केला. या तलावाचा उपयोग नौकाविहारासाठी व अवतीभवती बागबगीचा करण्यासाठी करण्यात यावयाचा होता. तळयाचे काम सुमारे १७५० मध्ये सुरू झाले. १७५३ सालीही ते चालूच होते. एके दिवशी पर्वतीवर दर्शनास जाताना वाटेवर नानासाहेब पेशव्यांनी हे काम दिरंगाईने चाललेले पाहिले. ते पाहून ते संतप्त झाले व हत्तीवरून उतरून स्वतः दगड उचलून तळयाची भिंत रचू लागले. स्वतः पेशव्यांना असे काम करताना पाहून कामगार शरमिंधे झाले, नागरिकांनाही धडा मिळाला व सर्वजण जोराने कामाला लागले.

नानासाहेब पेशव्यांनी खोदलेल्या तलावाचे क्षेत्रफळ दोन हजार स्क्वेअर मीटर होते. या तलावाच्या मध्यावर सुमारे पंचवीस हजार चौरस फूट आकाराचे बेट, बागबगीचा करण्यासाठी तलाव खोदीत असताच राखून ठेवण्यात आले होते. या बेटावर सुंदर बाग तयार करण्यात आली. हिलाच पेशव्यांनी सारसबाग असे सुंदर नाव दिले.

याच बागेत श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनी इ. स. १७८४ मध्ये एक छोटेसे मंदिर बांधून त्यात आपले उपास्य दैवत श्रीसिद्धिविनायक गजानन यांची स्थापना केली.

सारसबाग व तेथील गणपती यांचा असा आरंभ आहे. त्या वेळेपासून हा बाग व मंदिर ही पुण्यातील लोकांची देवदर्शनाची व फिरण्याची जागा ठरली. याच तलावात श्रीमंत पेशवे व त्यांचे मुत्सद्दी सल्लागार यांची नौकाविहाराच्या निमित्ताने गुप्त खलबते, चर्चा चालत असत. या प्रसंगी जे नावाडी असत ते एक तर हबशी किंवा ठार बहिरे व मुके असे निवडत. उद्देश हा की, गुप्तचर्चा बाहेर जाऊ नयेत निदान अशी दंतकथा होती.

¤

तळ्यातील या गुप्त खलबताचा उल्लेख करून आपल्या भाषणारंभी सेतू माधवराव पगडी म्हणाले,

'पेशवे, शिंदे व नाना फडणीस याच्यातील खलबते गजाननाने सर्व ऐकली. त्यातील थोडीशीच बखरीत आली. सारसबागेत व्याख्यान म्हणून 'नाना फडणीस व महादजी शिंदे' हा विषय मी निवडला. या विषयावर चिं. ग. भानू यांचे 'नाना व शिंदे' असे पुस्तक आहे. पण वासुदेवशास्त्री खरे यांचे 'अधिकारयोग' हे नानांचे चरित्र सर्वोत्कृष्ट आहे. नाना व शिंदे याच्यावर अनेक आख्यायिका प्रसृत झाल्या. त्यातून दोघातील स्पर्धेचा फार गवगवा झाला. या कथा खऱ्या मानण्यापूर्वी त्या दोघात कसली स्पर्धा होती हे तरी पहा. दोघांनी काय केलं ते पहा.'

शिंदे व नाना यांच्यातील स्पर्धेचा इतिहास व स्वरूप सांगण्याआधी पगडींनी महादजी व नाना दोघानाही लोक विसरले आहेत याबद्दल खेद व्यक्त केला. ते म्हणाले, 'नाना फडणीस महाराष्ट्रात करमणुकीपुरते उरले आहेत व महादजींना महाराष्ट्र तर विसरलाच आहे पण त्यांच्या ग्वाल्हेरीत त्याच्या पुतळ्याशिवाय काही नाही व त्या पुतळ्यावरही इतकी धूळ की, तो कुणाचा हे ओळखू येत नाही. महादजीवर एकही पुस्तक नाही. मध्य भारतात मराठी राज्याबद्दल कुणाला काही राहिलेले नाही. 'माळवामें आप आयेही क्यूं?' असा प्रश्न ते महाराष्ट्राला विचारतात. महादजीमुळे दिल्ली शहर आपल्या ताब्यात होते–अठरा वर्षे आपण दिल्लीला राज्य केलं, असं म्हटलं की ते म्हणतात–'अरबी भाषेतील सुरस गोष्टी सांगता.'

'नाना फडणिसांनी चाळीस वर्षे मराठी राज्य तगवले व इंग्रजाचे थोपवले. महाराष्ट्रात नाना फडणिसांचे काय राहिले? घाशीरामच्या निमित्ताने नानाची सोंगे निघत आहेत. इ. स. १७९४ मध्ये निजाम मशुर उलमुकला वाटलं मराठ्यांत दम राहिला नाही. त्याच्या दरबारात त्याने नाना फडणवीस पेशवे याची सोंगे आणली. तेथील पेशव्याचे कारभारी गोविंदराव यानी तो प्रकार पुण्यास येऊन सांगितला. पुढच्याच वर्षी नानानी निजामाला दाती तृण धरायला लावून पस्तीस लाखांचा मुलूख निजामाकडून घेतला. निजामाचा दिवाण तीन महिने कैदेत ठेवला.'

पगडी पुढे म्हणाले, 'घाशीराम कोतवाल नाटक पहात असता माझ्या मनाचा क्षोभ झालाच. पण नाटकाच्या मध्यंतरात कॉफी पिण्यास बाहेर आलो. तिथे एक विद्वान प्रोफेसर म्हणाले, 'काय चॅन्स मारलाय लेकानं!' –(म्हणजे नाना फडणिसानं). आज महादजी व नाना दोघे काळाआड गेले आहेत. त्याची स्मारके जर कुणी अशा तऱ्हेनं ठेवायची ठरविली तर कोण काय करणार? घाशीराम नाटकाच्या रात्री मला फार वाईट वाटले. ठीक आहे; पण खरा इतिहास काय आहे हे तर जाणून घ्या. नाना फडणिसांनी काय केले ते तर ऐका. पूर्वी वासुदेवशास्त्री खरे यांनी नानांचे एक उत्कृष्ट चरित्र लिहिले ते मी तुम्हाला 'वाचा' म्हणून म्हटले असते; पण कुठल्याही वाचनालयात ते नाही किंबहुना ठाऊकही नाही. महादजी व नाना यांत कसली स्पर्धा होती ते तरी पहा.'

¤

घाशीराम कोतवाल या नाटकाने इतिहास संशोधक सेतू माधवराव पगडी याना दु.ख तसे महाराष्ट्रात अनेकाना दुःखी केले. अर्थात दुःखी झाले ते सारे इतिहाससंशोधक होते असे नव्हे. ज्या संस्थेने हे नाटक बसविले त्या संस्थेचे प्रमुख श्री. भालबा केळकर, या नाटकाने केवढे व्यथित झाले होते हे माझ्याप्रमाणे अनेकांनी पाहिले असेल. त्याउलट त्या नाटकाने अनेकाना आनंद दिला. खरा कलेचा आनंद दिला व 'काय चान्स मारलाय या स्वरूपाचाही दिला, तर ब्राह्मणांची कशी जिरवली हाही आनंद दिला. दु.खी होणाऱ्यात जितक्या तऱ्हा होत्या तितक्याच आनंदी होणाऱ्यात होत्या. घाशीराम रंगभूमीवर आल्यावर अनेकांनी विचारले होते की, लेखक व डायरेक्टर अशा तऱ्हेचे नाटक शिवाजीमहाराजांवर लिहितील का व डायरेक्ट करतील का? या प्रश्नाला दोन उत्तरे होती १: कोणत्या विषयावर लिहावयाचे हा लेखकाचा प्रश्न आहे. २: सांगून कलाकृती होत नसतात. लेखक दिग्दर्शक यांच्या बाजूनं ही दोन उत्तरे असली तरी कुणीही लेखक दिग्दर्शक शिवाजीमहाराजावर तसले नाटक करावयास धजणार नाही हे तिसरे उत्तर होते.

घाशीरामसारखे नाटक लिहिले जावे याला परिस्थितीची कारणे असणारच. ती अशी असू शकतील. १: एस्टॅब्लिशमेंटच्या विरुद्ध लढा. ब्राह्मणानी पूर्वापार केलेल्या अन्यायाचा संताप. २: सर्वच लेखकात असलेला खोडसाळपणा, मत्सर आणि विकृत्या.

चौथे एक कारण खुद्द सेतू माधवराव पगडी यांनीच दिले. ते म्हणजे गेली शंभर वर्षे नाना व महादजी याचे पडलेले विस्मरण. दोघांची कुणाला आठवण नाही ही परिस्थिती कलेसाठी घ्यावयास लागणाऱ्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने लेखक व दिग्दर्शक दोघाना पोषक वाटली.

नानांच्या कर्तबगारीचे विस्मरण पडल्याचा आणखी एक पुरावा म्हणजे या नाटकात काम करणारी तरुण मंडळीची नाटकाबद्दलची खुषी. ही तरुण मंडळी बहुतेक नानांच्या जातीची आहेत. या तरुण मंडळीना नानांचे चरित्र सेतूमाधवराव पगडी यांच्याइतके ठाऊक असते तर कदाचित या तरुणांनी या नाटकात कामेही केली नसती. नाटक पाहून आल्यावर त्याच्या घरच्या मंडळीची व त्याची भाडणेही झाली असतील ही माझी खात्री आहे. पण तरुण पिढीला नानांची माहिती नव्हती. काही श्रद्धा नव्हती, आणि श्रद्धेचा भंगही नव्हता. त्यांना हे नाटक म्हणजे एका जुन्या रंगेल म्हाताऱ्याचे चित्र होते.–एक गम्मत होती. घाशीरामाबद्दल

घरच्या व दारच्या म्हाताऱ्यांचा आक्रोश पाहून, आपला मागच्या पिढीचा राग निघाल्याचे समाधान त्यांना लाभले असेल.

□

श्री देवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरूड, याचे सरपंच भाऊसाहेब पटवर्धन यांच्याशी बोलताना सारसबाग सिद्धिविनायक मंदिराबद्दल आणखी गोष्टी कळल्या. त्यांनी सांगितले, 'येथे दर्शनासाठी येणाऱ्या वर्गात तरुण वर्गच बहुसंख्य आहे. त्यातले कुणी परीक्षेत यश येण्यासाठी येतात. पॅंट घातलेली तरुण मुले, मुली निःसंकोचपणे साष्टांग नमस्कार घालताना दिसतील. नव्या पिढीत श्रद्धा वाढलीच आहे. येथे इतकी तरुण मुले येत असून अनुचित प्रकार एकही घडत नाही. इथे सिगारेट ओढू नका किंवा पाय पसरून बसू नका असे सांगावे लागत नाही. जरी ही पिढी बाहेर उच्छृंखल वाटली तरी येथे शांत असते. कित्येक तरुण येथे ध्यान लावून बसतात. कुमार गंधर्व येथील वातावरणावर अतिशय खूष झाले.

देवदर्शनास मुसलमान, बोहरी, शीख, पारशी, पाश्चात्त्य सर्व येतात. बूट काढून आंत येतात. येथे भक्तीने आलेल्या सर्वांना जाती धर्मनिरपेक्ष मुक्तद्वार आहे. सर्वांचे स्वागत आहे.'

पटवर्धनांनी आरती मंडळाची हकीगत सांगितली. मंदिरात वारंवार येणाऱ्याच्या लक्षात आले असेल की गाभाऱ्यापुढील चौकटीत आरतीच्यावेळी दहा बारा मंडळी जोराने आरत्या म्हणत असतात. हेच ते आरती मंडळ. हा शंभर एक भक्ताचा समुदाय आहे. हे मंडळ पंचवीस वर्षापूर्वी सुरू झालं. रोज सकाळ संध्याकाळ येथे येऊन आरती करावयाची हा त्यांचा नेम. पटवर्धन म्हणाले 'पूर्वी संस्थानला उत्पन्न नव्हतं तेव्हा ते गणेश याग करीत. त्यासाठी आपापसात वर्गणी काढीत. आता संस्थानातर्फे गणेशयाग होतो व आरती मंडळ त्यात सामील होतं. वेदीपाशी आम्ही त्याचे चार लोक घेतो. देवळातील समारंभाचे वेळी जे स्वयंसेवक लागतात ते या आरती मंडळातूनच आम्हाला मिळतात. ते श्रद्धेनं अहोरात्र काम करितात. या मंडळाचे प्रमुख कल्पना मुद्रणालयाचे श्री. पाटील हे आहेत. तसेच श्री. आरोळे व इनकम टॅक्स एक्स्पर्ट रामभाऊ भागवत प्रमुखात आहेत.'

सारस बागेतील जे मंदिर आपण आज पाहतो ते १९६९ साली बाधायला घेतले व १९७३ साली पूर्ण झाले. साडेपाच लाख रुपये खर्च आला. ही रक्कम सर्वथैव लोकांच्या देणग्यातून उभी राहिली. मंदिराच्या मागे दुसरी इमारत झाली आहे. तिला साडेचार लाख खर्च आला. त्यात देवस्थानची कचेरी, एक सास्कृतिक माजघर, स्वयंपाकघर व जेवणासाठी खोली वगैरे सोई आहेत. नवस फेडण्यास लोक इथे येतात. संकष्टी चतुर्थी करितात. नैवेद्य करितात. पुढच्या पाच पाच महिन्याच्या संकष्टी चतुर्थ्या नोंदवलेल्या असतात. जेवणाचा हॉल हा चतुर्थ्यांसाठी आहे.

सास्कृतिक माजघरात भिंतीवर चित्रकार आपटे यांनी गणेश पुराणातील कथेवरची चित्रे काढून लावली आहेत. आपटयाच्या एका डोळयात मोतीबिंदू पडला व दुसरा डोळा अधू झाला. डॉक्टरानी काही वाचू नका, चित्रे काढू नका असे सांगितले. त्यावेळी त्यांनी गणेश पुराण वाचले होते व रोज स्वप्नात त्या कथा येऊ लागल्या. कथेची चित्रे दिसू लागली. झोपेतून उठल्यावर ती चित्रे ते टिपू लागले. वर्षभर ही स्वप्ने पडत होती व वर्षभरात त्यांनी गणेशाची पृथ्वी प्रदक्षिणा वगैरे एकवीस कथाची चित्रे काढली. डॉक्टरांनी त्याना सहा महिन्यानी मोतीबिंदूच्या तपासणीसाठी बोलावले होते. ते तपासणीस गेले तेव्हा डॉक्टर चकित झाले. मोतीबिंदू सपूर्ण गेला होता. आपटे याच्याकडून ही कथा चित्रे संस्थानाने तैलरंगात करून घेतली. आपटे यानी चित्राच्या सामग्रीचा खर्च तेवढा घेतला.

□

आज सारसबाग गणेशमंदिर भक्तांचे लाडके स्थान बनले आहे. पेशव्याच्या वेळीही ते लाडके झाले होते. पण याशिवाय सारसतळयात राजकीय खलबते चालत असल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागले. इतकेच काय, आजही ती खलबते डोक्यात राहिली. नाना व महादजी याच्यामधील स्पर्धेचे तणाव या तळयावर काढले गेले या समजुतीविषयी बोलताना सेतुमाधवराव पगडी म्हणाले, 'त्या दोघात स्पर्धा वगैरे नव्हती. ती समजूत खोटी. दोघाचे कार्यक्षेत्र दूरदूर व वेगळे होते. त्यामुळे एकमेकांच्या अडचणी दोघांना कळत नव्हत्या, इतकेच. दक्षिणेत मुसलमानी सत्ता येऊ नये म्हणून नानाला टिपूला आवरावयाचं होतं आणि इंग्रजाना पायबंद घालावयाचा होता. त्यासाठी तिकडे शक्ती एकवटावयाची होती. उलट उत्तरेत मोंगलाची सत्ता खिळखिळी करावयाची यासाठी पेशव्यानी इकडे मदत द्यावी असे महादजींना वाटत होते. दोघाना एकमेकाची मदत हवी होती व ती मिळत नव्हती. म्हणून तणाव होता. स्पर्धा नव्हती.

अनेक उदाहरणे देऊन महादजी व नाना याची कर्तबगारी पगडीनी विशद केली. दीडशे वर्षाच्या मोगल अमदानीत महादजी शिंदे हा पहिला हिंदु संरक्षणमंत्री झाला व पेशवे पहिले हिंदु पंतप्रधान झाले. नाना फडणिसासारखा हार्ड वर्किंग ॲडमिनिस्ट्रेटर नव्हता. नानाच्या एकटयाच्या हातची चौदा हजार पत्रे उपलब्ध आहेत. महादजी शिंदे यानी तर शिवाजी महाराजाचे स्वप्न साकार केले. नाना व महादजी याच्यातील भांडणाबद्दल एकदा परशुरामभाऊ फडके म्हणाले, 'हे मित्रातले भाडण, आकाशात आभाळे येतात, गर्जतात व जातात. दोघांच्या मनात काम नासेल अशी भूमिका नाही.' इंग्रजाची वाढती महत्त्वाकांक्षा पाहून नानांनी सर्वांना हाकारा दिला, 'बावांनो! इंग्रजाविरुद्ध एक व्हा.' नानानी इंग्रजाविरुद्ध ऑल इंडिया फेडरेशनच उभे केले. आज आपण एकॉनमिक ब्लॉकेड म्हणतो तसे प्रथम नानानी इंग्रजाचे केले. बंदरात जहाजे अडकवून व्यापार बंद पाडला. तेव्हा त्यानी जहाजे सोडावी म्हणून नानांना व्यापाऱ्याच्या एकेक लाख रुपयाच्या देणग्या आल्या. पण या देणग्या न घेता कोंडी अधिक तीव्र करून नानानी इंग्रजाना शरण आणले.'

महादजी व नाना दोघांनी मराठी राज्य टिकवण्यास केलेल्या प्रचड उद्योगाचे व परिश्रमाचे चित्र उभे करून पगडी आपल्या व्याख्यानाचे शेवटी म्हणाले,

'गेल्या महायुद्धातील मार्शल याच्याशी मी नानांची तुलना करतो. या युद्धात रणांगणावरील सेनापतीचे खूप नाव झाले. पण सैन्याच्या हालचाली, त्याना रसदा पुरवणे, शस्त्रास्त्र पुरवठा वगैरे पडद्याच्या मागच्या गोष्टी करण्यास मार्शल नसता तर सेना-

पतीनी काय केले असते ? महादजी हे मराठी राज्याचे आयशेनहॉवर होते तर नाना हे मराठी राज्याचे मार्शल होते. नाना आहेत तोपर्यंत मराठी राज्य जिंकता येणार नाही असे इंग्रज म्हणत ते उगीच नाही. चाळीस वर्षे नानानी मराठी राज्य राखले ही महान कर्तबगारीच. दक्षिणेत नाना व उत्तरेत महादजी शिंदे असे दोन फार थोर पुरुष तेव्हा होऊन गेले.'

◘

'घाशीराम कोतवाल' नाटकाला काही वर्षे झाली. आता दुसरी नाटके गाजली, चर्चा झाल्या. आता इतक्या वर्षांनी घाशीराममधील नानाच्या चारित्र्यहननाबद्दल श्री. सेतू माधवराव पगडी याना वाईट वाटत आहे हे पाहून पगडीबद्दल मला असे दुःख झाले की, इतिहासातील चांगल्या गोष्टीबद्दल श्रद्धा असलेल्या या माणसास कुणी का दुःख द्यावे ! पण आम्ही ललित लेखक काय चीज आहोत हे न कळण्याने ते झाले. आम्ही जसे कलेत सौंदर्य आणण्यामागे असतो तसेच सामाजिक उद्रेकही आमच्यामधून बाहेर येतात व आमचे मत्सर, राग, दुराग्रह, विकृत्या, महत्त्वाकांक्षा हेही आमच्या वाङ्मयातून डोकावत असते. त्यामुळे कुणी दुखावलं जातं व दुखावला गेलेला सबळ असेल तर काही काळ खळबळ माजते व तीही आम्हाला हवी असते. पण लवकरच सारं विझून जातं. तेव्हा या किंवा अशा वाङ्मयामुळे नाना फडणिसांचं नाव जाईल असे पगडीनी धरू नये. कालांतराने त्यातील नाना वगैरे नावे नानांची वगैरे धरली जाणार नाहीत. प्रत्येक काळात रंगेल माणसं असतात तसे हे चित्रण धरले जाईल. नाटकातील सांघिक अभिनयाची स्तुती होईल. नाना फडणीस याचे महत्त्व त्यामुळे कमी होणार नाही. उलट या उत्सवाच्या व घाशीराम नाटकाच्या निमित्ताने विस्मृतीत गेलेल्या या दोन मोठ्या पुरुषाबद्दल सेतू माधवराव पगडी बोलले व दोघाच्या थोरपणाला त्यानी उजाळा दिला, तसाच एखादा ग्रंथ ते लिहितील व नाना फडणीस व महादजी लोकांच्या स्मृतीत थोर पुरुष म्हणून राहतील.

◘

" गेल्या वर्षी मी पुण्यामधील देवळांच्या उत्सवातील कार्यक्रमांबद्दल लिहिले तेव्हाच एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती की, पुण्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धुरा हळूहळू देवळेही खांद्यावर घेऊ लागली आहेत. उपाशी विठोबा मंदिर, खुन्या मुरलीधर मंदिर, राम मंदिर, नारद मंदिर, नवीपेठ विठ्ठल मंदिर वगैरे देवळे उत्सवात विविध विषय घेऊन ज्ञानदान करू लागली आहेत. इतर पुष्कळ संस्थाही असे कार्यक्रम करीत आल्याच आहेत. त्या दोघात स्पर्धा लागून पुणेकरांना अधिक अधिक सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम ऐकावयास मिळावेत. मात्र ही स्पर्धा नाना व महादजी यांच्या स्पर्धेसारखी 'आकाशात आभाळे येती, गर्जती व जाती' अशी असावी.

◘

बगाड (७)

# सिंहासन - झरोक्यातून पाहिलेले

बध्या

तुम्ही 'सिंहासन' ही कादंबरी वाचल्येय् का, अरुण साधूची ? तिच्यावरचा सिनेमा येणार आहे या आठवडयापासून. पाह्यला गेलंच पाहिजे आपण. अशी बेफाट कादंबरी क्वचितच वाचायला मिळते. त्यातून राजकारणावर आधारलेली इतकी आकर्षक कादंबरी मराठीत मी आजपर्यंत वाचलेली नव्हती. आपल्या राजकीय कादंबऱ्या म्हणजे वर्तमानपत्रांची कात्रणं जोडलेल्या प्रेमकथा असतात. राजकारणाशिवाय ज्यातले प्रसंग आणि पात्रे उभीच राहू शकत नाहीत अशी कादंबरी म्हणजे सिंहासनच.

वा, वा अण्णासाहेब, अगदी साहित्यसंमेलनातल्या परिसंवादात बोलल्यासारखं भाषण करताय्.

हं, हल्ली साहित्यसंमेलनात परिसंवाद फक्त एकाच विषयावर होऊ शकतो. तो म्हणजे दलित–साहित्य. आता परिसंवादाला पुरेल इतकं दलितसाहित्यच अजून अस्तित्वात नसल्याने असा परिसंवाद असावा की नाही यावरच चर्चासत्र सुरू झाल्येत. ते असो. पण ही 'सिंहासन' कादंबरी मी वाचली आणि त्यावर विजय तेंडुलकर पटकथा लिहून चित्रपट काढताय्त असं कळलं तेव्हा ठरवलं की तुम्हाला घेऊन या चित्रपटाला जायचेच.

सिनेमाला तर जाऊच या, पण चित्रपट येणार म्हणून अगोदर तुम्ही कादंबरी वाचून ठेवली याबद्दल अभिनंदन केलं पाहिजे तुमचं.

## आकर्षक कादंबरी

छ्या:, माझं कसलं अभिनंदन करताय्. अहो, ही कादंबरीच अशी झपाटणारी आहे की, हातात घेतली की सबंध वाचल्याखेरीज राहवणारच नाही. सत्ता म्हणजे काय, तिच्यासाठी माणसं कशी विधिनिषेधशून्य वागायला लागतात आणि मुख्य म्हणजे सत्तेभोवती रुंजी घालणारी ही नेतेमंडळी कशी स्वार्थी आहेत याचं भारावून टाकणारं वर्णन केलंय बघा तुमच्या साधूनी.

शाब्बास अण्णासाहेब. तुमच्या वैखरीला अगदी बहर आलाय. सांगा बघू काय काय आवडलं तुम्हाला या कादंबरीत ते.

कादंबरीचा विषय तसा नेहमीचाच आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर अर्थमंत्री डोळा ठेवून असतात. आमदारांचे निरनिराळे गट आपल्यामागे उभे करून चालू मुख्यमंत्र्यांना पदच्युत करण्याचे कारस्थान ते रचत असतात. हे कारस्थान अखेर उघळले जाते आणि अर्थमंत्री पराभूत होऊन राजीनामा देतात. सगळा चार-सहा दिवसाचा खेळ असतो. ही सर्व कारस्थाने, परस्परांवर केलेल्या कुरघोडया आणि युत्या व छेद सत्तारूढ कोंडाळयात फार मोठी खळबळ माजवतात. पण यातली कोणतीच बातमी आम जनतेला कळत नाही. सगळा कारभार पडद्याआड आणि बंदिस्तपणे चालतो. अर्थात् अशी कारस्थाने नेहमीच चालत असतील.

पण या सत्ताकांक्षी कारस्थानाची चित्तरकथा आपल्याला अगदी गुडाळून टाकते. नुसती *वर्तमानपत्रे वाचून राजकारणाविषयी बोल*णारे आपण लोक नुसते थोर आहोत असं वाटायला लागते.

मध्येच बोलतो म्हणून माफ करा हं, अण्णासाहेब. कारण तुम्ही अगदी रंगात आलाय. पण हल्ली ही पडद्याआडच्या राजकारणाविषयी जाणतेपणाने बोलण्याची फॅशन फार वाढत चालल्येय् असे नाही तुम्हाला वाटत ? *आणीबाणीनंतर इंदिरा गांधीविषयी* 'खरं खरं' सांगणारी किती पुस्तकं निघाली ? त्यांनी बाई, ह्याचा गोतावळा आणि त्या गोतावळ्याची सत्ताधुंदी याविषयी कितीतरी गुप्त गोष्टी आम जनतेला अगदी विश्वासात घेऊन सांगितल्या. आपल्या महाराष्ट्रातले राजकारण आणि राजकारणी यांच्याविषयीही 'आतलं', 'अगदी आतलं' असं काही कमी लिहिलं गेलं नाही पण इतकी सगळी वस्त्रे नागझरीवर धुतली जाऊनही लोकांच्यावर त्याचा काही परिणाम झालेला दिसत नाही. कोणी असं म्हणताना आढळत नाही की, दहा वर्षं वर्तमानपत्रे बंद ठेवून मागून प्रसिद्ध होणारी ही 'रिव्हीलिंग' पुस्तकच घेऊ या. म्हणजे खासगी राजकारणाविषयी आतल्या वर्तुळातल्या लोकांनी सागितलेल्या हकीकतीची भेसळ सार्वजनिक राजकारणात लोक करतात असे दिसत नाही. असो, पण तुम्ही आपले कादंबरीविषयी बोला.

दुसरे मला या कादंबरीविषयी आवडलं ते म्हणजे– राजकीय सत्तेच्या विराट आणि अजस्र रूपाचं घडणारं दर्शन. ह्या सत्तेचा ऑक्टोपस महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आडवातिडवा पसरलेला आहे. मलबारहिलच्या गगनचुंबी इमारतीत राहणारे उद्योगपती, उपनगरातल्या वारुळातून कारकून आणि झोपडपट्टीतल्या भांडीवाल्या मोलकरणी आणि गुत्तेवाले; लांबच्या बारामती, लातूर आणि यवतमाळ अशा ठिकाणी असलेले ऊस, कापूस व द्राक्षे याचे मळेवाले तसेच शेतमजूर; कोकणकिनाऱ्यावरचे कोळी, वारली कोणीही या सत्तेच्या विळख्यातून सुटलेला नाही. भौगोलिक दृष्टीने लव्या–चवड्या प्रदेशावर विखुरलेले, आर्थिक दृष्टीने अकटोविकट तफावत असणारे आणि शैक्षणिक किंवा सांस्कृतिक बाबतीत ज्यात मुळीच ताळमेळ बसू शकत नाही असे जीव सत्तेच्या *भोवऱ्यात सापडून एकमेकाशी बांधले गेले* आहेत हे जेव्हा साधू दाखवतात तेव्हा आपण अगदी थक्क होऊन जातो.

तिसरे वैशिष्टय या कादंबरीचे असे की, सत्तारूढ वर्गाचे यात घडणारे दर्शन आपल्या कल्पनेपेक्षा साफ निराळे आहे. तुम्ही आम्ही अशा वातावरणात वाढलो की, जिथे राजकारणी लोकांविषयी तुच्छतेने बोलले जायचे. हे *लोक अशिक्षित असतात, हाताखालचे* जाणते, सुशिक्षित, वरच्या जातीतले नोकरशहा याना पाहिजे तसे वाकवू शकतात, वागण्याबोलण्यातली आदब आणि विचारांचा आक्षेप मंत्र्याना नसतो अशा तऱ्हेचे शेरे आपण नेहमी ऐकत असू. पण या कादंबरीत दिसणारे मंत्री आणि त्यांच्या कोडाळ्यातले लोक अगदी निराळे आहेत. कोणत्याही घटनेचा *आपल्या मतलबासाठी उपयोग करून* घेण्याची चतुराई त्याच्यापाशी आहे, त्याचप्रमाणे कोणत्याही घटनेत किंवा प्रसंगात किंवा व्यक्तीच्या वागण्यात काही अनपेक्षित आणि गोंधळून टाकणारे त्याना भेटते आहे असेही वाटत नाही. सत्तेशी या सगळ्यांची चांगली तोडओळख आहे. ती कशी वापरता येते आणि कुठे ती निरुपयोगी ठरते याची *खोल जाण त्यांच्यापाशी आहे.*

त्यानंतर आपल्याला जाणवते ते लेखकाचे तपशील टिपण्याची सामग्री. सत्ताधारी लोकांच्या लकवी, परस्पराशी बोलताना त्यांच्यात उत्पन्न होणारे तणाव, त्याची पूर्वायुष्ये आणि त्यांत त्यांनी केलेले खेळ; सचिवालयातले अधिकारी, कारकून, पट्टेवाले याचे स्वार्थ आणि अल्पांक्षा; वार्ताहर, साधे *आमदार, पक्षाचे कार्यकर्ते वगैरे सत्तेभोवती* फिरणाऱ्या महाग्रहाच्या आसपास घिरट्या घालणारे उपग्रह–एक ना दोन या किरकोळ तपशिलानी कादंबरी कशी भरघोस आणि रोचक होते.

## झरोका

भले अण्णासाहेब कादंबरीची बलस्थान तुम्ही *अगदी नेमकी हेरली आहेत. आपण* साधी–सुधी माणसे नाकासमोर चालणारी आपल्याला मंत्र्याचे दर्शन होणार ते फक्त टी. व्ही वर किंवा वर्तमानपत्राच्या फोटोत. साहजिकच तुम्हा आम्हाला 'मंत्र्याचे कैंचे बोलणे, मंत्र्याचे कैंचे पाहणे, मंत्र्याचे सलगी *देणे कैंचे असे' याविषयी अपार कुतूहल* असते. माझा एक मित्र होता. आम्ही लहान असताना हिराबागेवर क्रिकेटची मॅच पाहयला जायचे. लंचची वेळ झाली की हा दहा मिनिटे आधी जिमखान्याच्या इमारतीतल्या जेवणांच्या खोलीच्या खिडकीखाली जाऊन उभा ऱ्हायचा खेळाडू जेवायला लागले की हळूच ठोकावून पाहायचा. मागून सागायचा *की, बापू नाडकर्णी जेवताना मुळीच सांडत* नाही, गौराप्पा तोडलबाजी ढेकरा देत होता वगैरे. गम्मत म्हणजे आसपासची पोक्त माणसे सुद्धा हे चऱ्हाट लक्ष देऊन ऐकायची. तेव्हा प्रसिद्धीच्या झोकात असलेल्या व्यक्तीविषयी कुतूहल हे सामान्य माणसाना असतेच; आणि त्याचे मुख्य कारण हे की, प्रसिद्ध व्यक्ती जशी आपल्यापुढे येते ती खरे *पाहता नसणार अशी आपली खात्री असते.* त्यामुळेच प्रसिद्ध नेत्यांच्या, नटाच्या, लेखकाच्या अगदी जवळच्या माणसांनी लिहिलेल्या हकीकती लोक आवडीने वाचतात. साधूनी हे हेरलेले असते. आपले कुतूहल त्यांनी एका कथानकात गुंफून भरपूर प्रमाणात पूर्ण केले आहे. आर्थर हेली नावाचा इंग्रजी कादंबरीकार निरनिराळ्याबद्दल कादं*बऱ्या लिहीत असतो. तशीच ही खुमासदार* कादंबरी साधूंनी मंत्र्याच्या व्यवसायासंबंधी लिहिली आहे. हेलीच्या कादंबऱ्यातून देखील त्या त्या व्यवसायातला कडोतिकडीचा प्रसंग आलेला असतो आणि त्या प्रसंगाच्या दडपणाखाली व्यवसायी व्यक्ती वावरत असतात. आता राजकारण हा पेशाच अतिशय व्यापक असल्याने आणि त्याचे आपल्या *समाजाला असलेले अकर्षण बलवत्तर अस*ल्याने सिंहासन ही कादंबरी जास्त परिणामकारक झाली आहे यात शंका नाही.

छान, म्हणजे माझा कादंबरीबद्दलचा सारा उत्साह निकालातच निघाला की ! नाही. अण्णासाहेब, तसे नाही. तुम्ही कादंबरीचे वर्णिलेले सगळे गुण मला मान्य आहेत. ती कादंबरी आकर्षक आहे यात *मुळीच शंका नाही. मी फक्त तिचे प्रधान* आकर्षण निराळ्या शब्दात सांगितले इतकेच. ते आकर्षण मुख्यत: सामान्य माणसाला सत्तेच्या जगात जाणकारीने फेरफटका घड-

वून आणण्यात आहे. त्यामुळे सत्ता आणि यांचे आपल्याला इतक्या जवळून दर्शन घडते की सत्तेची इतर परिमाणे आपल्या ध्यानातच येत नाहीत. मला ही कादंबरी वाचनीय वाटली तरी पुढे समाधान देऊ शकली नाही, ती यामुळेच.

हे पहा बघ्याची नुसती शेरेबाजी नको. नीट खुलासेवार सगळे सांगा बघू.

झालंय काय आण्णासाहेब, की ही सगळी कादंबरी–म्हणजे कादंबरीतल्या घटना– आपण दिगू चिटणीस या फाकाराच्या नजरेने पाहतो. या फाकाराचा आणि कादंबरीतल्या प्रमुख पात्रांचा संबंध कसा आहे? दिगूला सत्ताधाऱ्याविषयी आकर्षण आणि कुतूहल आहे. त्यांतले काही त्याचे मित्र आहेत. त्यांच्याविषयी त्याला चांगली माहिती आहे. सत्तेच्या चक्राविषयी एक मूल्यशून्य जिज्ञासा दिगूच्या ठिकाणी आहे. एखादा जीवाभ्यासू प्रयोगशाळेतल्या उंदरांच्या वर्तनाकडे जसे पाहतो तसे तो राजकारणाच्या खेळाकडे पाहतो–सगळे तपशील टिपत पण तटस्थपणाने चांगल्या–वाइटाविषयी उदासीन राहून, नव्हे, चांगले–वाईट असे काही असूच शकत नाही अशी स्वतःची समजूत घालून.

पण मग यात बिघडले काय?

आपण उत्तर हिंदुस्थानातले दरबारचे दिवाणखाने पाहतो तेव्हा आपल्याला संगमरवरी जाळीने झाकलेले झरोके दिसतात. त्याच्यामागे जनाना बसत असे. मला नेहमी कुतूहल वाटे की, या जनान्याच्या झरोक्यातून मयूरासनावर बसलेल्या आलमगिराकडे पाहतांना या स्त्रियांच्या मनात–त्याचा तेवढा मानसिक विकास झाला होता असे मानल्यास कोणते विचार येत असतील? त्यांना बादशहाच्या सत्तेचा दिमाख, दरारा आणि डौल जाणवत असलेच. त्याचे व्यक्तिगत सामर्थ्य आणि सिंहासनावर राहण्याचा वकूब याचीही जाणीव त्याना होत असेल, त्याच्या वागण्या-बोलण्याचा दाट परिचय असल्याने त्याने सिंहासनावरून घेतलेल्या निर्णयाच्या न्यायी–अन्यायीपणाची चिकित्सा देखील त्या करू शकत असतील. पण बादशहाी सत्तेचा खरा पाया म्हणजे त्या दरबारी दिवाणखान्याच्या बाहेर सर्वदूर पसरलेल्या प्रजेने त्याच्या अधिपत्याचा केलेला स्वीकार हा आहे याची जाणीव त्याना कितीशी होत आहे?

### प्रजेने स्वीकारलेला सत्ताधीश

अहो, पण विचार या कादंबरीच्या चौकटीत बसतच नाही. या कादंबरीतले सत्ताधारी हे निवडणुकीत निवडून आलेले आहेत. प्रजेने त्याच्या आधिपत्याचा स्वीकार केलेलाच आहे. वर्णन चाललेय ते फक्त एका दरबारी कारस्थानाचे.

तसे जर असेल, तर त्यात नवीन, निराळे आणि आकर्षक असे जे उरते ते फक्त मी मघाशी म्हटलेले कुतूहल–शमन एवढेच. दरबारी कारस्थाने अगदी वज्राघातापासून वर्णन केलेली आहेतच. मग मराठीतली खरीखुरी राजकीय कादंबरी हा तिचा गौरव कशासाठी? किलकचे किंवा कोंडळघाचे कारस्थान आपल्या वि. वा. हडपांच्या कादंबऱ्यांतूनदेखील आहे! राजकारणी नेत्यांची कारस्थाने विधिनिषेधशून्य असतात, त्यांना मूल्यविवेक नसतो, सत्तापिपासा या एकाच भावनेने झपाटून ते वावरत असतात, जनसामान्यांचं हित त्याच्या गांवीही नसतं किंवा ते केवळ बोलण्यापुरतं असतं हे सर्व शास्त्र कळतं; आणि साधू, ठाकूर, उमा वासुदेव वगैरे आतल्या गोटातल्या जाणकार व्यक्तींनी हे दुर्गुण निगतवार सांगणाऱ्या कहाण्या प्रसिद्ध करूनहि सामान्य जनताहि या नेत्यांचा सत्ताधारी म्हणून वारंवार स्वीकार का करते या प्रश्नाला हात घालणारी कादंबरी केव्हा मिळेल? की, कादंबरी हा वाङ्मय प्रकार असले प्रश्न हाताळूच शकत नाही?

□

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

## बदलत्या कथा (१)

# ताटातूट

वि. शं. पारगावकर

गावापासून तीन दिशानी तीन रस्ते गावाबाहेर जातात. एक उंबरविरीला जातो, दुसरा चुभळीला आणि तिसरा गावापासून थोडयाच अंतरावर असलेल्या मुख्य सडकेला जाऊन मिळतो. गाव खोलात आहे आणि गच्च झाडीत पूर्ण लपलेले आहे. गावाला वेस वगैरे किंवा पुरातनाच्या इतरही काही खुणा नाहीत: आत फक्त तीनचार निमुळत्या गल्ल्या आहेत. गावाच्या उत्तरेकडच्या टोकाला सुताराचं मेट आहे. आणि मेटाच्या पलीकडे असलेल्या चारपाच घरांपैकी एक भिवा नाव्ह्याचं आहे.

सकाळ फाकली तेव्हा भिवा आपल्या घरात पुढच्या छोटया ओटयावर मांडी घालून बसला होता. त्याच्या समोर तंबाखूची काळी मिचकूट पिशवी होती. चुन्याची डबी, चारपाच सुपारीची खांडं आणि एक छोटा अडकित्ता होता. तंबाखू चोळून त्याने तिची पूड काळजीपूर्वक तोंडात टाकली आणि तोंडाची मिठी आवळून तो स्वस्थ बसून राहिला. घरासमोरच्या थोडया जागेत त्याचं कुत्रं उगीचच इकडून तिकडे करीत होतं. त्याची बायको भावई आतल्या चुलीसमोर भाकरी भाजीत होती. भाकरी आणि मिरचीचं तिखट भिवाला बांधून द्यायचं होतं. आज त्याला दोन मैलावरच्या चुंभळीला जायचं होतं. सारा दिवस आज चुभळीतच जायचा होता. चुभळी, उंबरनिरी आणि पिंपळगाव ही त्याची बलुत्याची गावं होती. आणि त्याचं स्वतःचं राजुरी गाव.

या चार गावांच्या जिवावर त्याचा संसार चालला होता. वयाची साठ वर्षे त्याने इथंच काढली होती.

'अहो, ऐकलंत का? जरा आत या म्हणून कव्हा धरून वरडतेय?' भावई नवऱ्याला ओरडून म्हणाली.

भिवा जागचा उठला. कोपऱ्यातून अंगणात त्याने पिचकारी मारून तोंड मोकळं केलं. त्याचं त्याला वाईट वाटलं. कारण तंबाखूचा बार चांगला जमला होता. तिच्या झिणझिण्या मस्तकापर्यंत गेल्या होत्या. आणि एक चांगली तार आली होती. त्या तारेतच तो चुभळीचा रस्ता धरणार होता. आणि दिवसभरात साऱ्या कामांचा फडशा पाडण्याचा उत्साहही या तारेतच त्याला आला होता.

एरवी त्याचं शरीर आता थकलेलं होतं. त्याचं वय झालेलं होतं आणि अंगात पूर्वीचा जोम आता राहिलेला नव्हता. जिवाच्या करारानं तो आपली कामं करीत होता.

'तू काय सांगणार हायस ते म्हाईत हाय? पटकन भाकर बांधून दे. एकदा का उन्हं वर आली की मग लयी जड जाईल.' तो बाहेरच्या सोप्यावरूनच बायकोला म्हणाला.

'अहो, पण तुम्ही जाल आन् धा च्या बसनं राघू येईल. त्याला जादा ऱ्हायला येळ नाही. दुपारच्या चारच्या बसनं त्याला परत बिडाला जायचंय. तव्हा तुम्ही आज जाऊ नगा चुभळीला. काही एका दिवसानं बोकडं होत न्हाईत माणसाची. उद्या बी हजामती करता येतीलच की.'

'ते जमणार न्हाई. सांगितला दिवस हुकवायचा नाही. कधीबी म्या हुकवला नाही. हे पोटापाण्याचं काम हाय!'

'ते सारं म्हाईत हाय मला. पर राघूचं बी तिकडं पोटापाण्याचंच काम हाय? कचेरीत मोठ्या साहेबासमोर त्येला काम करावं लागतं!'

'पर त्यो येईल की पुढच्या सुटीला?'

'न्हाई, आज त्येला तुमच्या संगं बोलायचंय काही बाई. म्हणून मुद्दाम येणार हाय त्यो?'

'मग त्याला दे पाठवून चुंभळीला. तिथं बोलू आम्ही!'

'येड लागलं तुम्हाला?' ती ठसक्यात म्हणाली.

'येड लागायला काय झालंय? मस सागतोय तुला?'

'ते कळलं! ह्यो प्रश्न काय दुसऱ्या गावच्या चावडीत अगर पारावर डोईवरचे केस कापता कापता सोडवायचा हात काय?'

'अगं पण बोलायचं काय ऱ्हायलंय त्यात आता? मी मागंच सागून टाकलंय राघूला आणि नाराला की काही बी झालं तरी मी हे गाव सोडणार नाही! हितच माझा जलम झाला आन् हितच मातीबी हुईल.'

'पर राघू-नाराबी हितच जलमलेत नव्हं? एकबिडासारख्या शरात गेला आन् दुसरा तर त्याहून बी मोठ्या-औरंगाबादला डॉक्टर्स शिकतोय! दोन्ही बी पोरं तुमचं माझं पांग फेडाया झटलेत. आन् तुमचं आपलं बघावं तर तुमची आपली डोक्यात राख!' भावई फार चिडली होती.

'आगं नीट इचार कर? त्येचं शिक्षान कुनी केलं?. याच काळ्या आईत पिकणाऱ्या सोन्यातंच ना?'

'एक घर सोडलं तर या गावात काय हाय आपलं? इतभर जमीन तरी हाय का आपली? वर्षाला दुसऱ्यांच्या रानात जायचं आन् बलुत्याची भीक मागून पोटं जाळायची!'

'त्येच तर हक्काचं आहे आपल्या! वर्षभर कामधंदा करतोय तीन गावाचा. फुकट बसून खात नाही. हे बी वतनच आहे आपलं? गावाचा दैवाचा तो परसाद हाये. उगीच पोराच्या जिवावर काही येडं वंगाळ बोलू नगस!'

'अहो पन आता म्हातारपणी त्ये काम होनार हाय का तुमच्याच्यानी? हात कापायला लागलं म्हंजे कोन डोस्कं देईल तुमच्या म्होरं? जरा इचार करा. आन् राघूचं ऐका?'

'आज आता मी जातो. दादा पाटलाचं बोलावणं आहे. ते मायबाप हायत आपले.'

'पण मी म्हंते, तुमच्या जिवाला आज

ग्वॉड नसतं तर तुमी गेला असता का चुभळीला ?'

'नस्तू गेलो !'

'मंग तसंच समजा आज ?'

'कशापायी खोटेपणा करायचा पन ?'

'मंग जावा !'

भिवईनं भाकरीचं गाठोडं बाहेरच्या ओसरीवर आणून त्याच्यापुढे दणकन् आदळलं आणि तरा तरा चालत ती आतल्या खोलीत फणकाऱ्यानं निघून गेली. रागानं तिचा चेहरा लालभडक झाला होता. डोळ्यात अंगार जळत होता. आणि हातापायाचा तोल सुटला होता.

भिवा भिंतीला टेकून उभा होता तो तसाच उभा राहिला ! त्याचे म्हातारे काळेभोर डोळे शांत होते. चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या त्यामुळे देवीचे वण बुजून गेले होते. अंगात कोपरी होती. कोपराखालचे हात पाढऱ्या लवीनं गच्च भरले होते. ते लिबलिबीत दिसत होते. पण त्याची मनगटं भारी होती. मोठाड होती. तळवे आणि बोटाची पेरं खमखमीत दिसत होती. सारं आयुष्य डोकी आणि म्हशी भादरण्यात गेलं होतं. त्याच्या मनगटात आणि बोटाच्या पेरात साऱ्या आयुष्याचं सारं साठविलेलं होतं.

दोन तीनदा त्याने आपलं डोकं मागल्या मागंच भिंतीला आपटलं आणि विचार केला. मोठं कोडं पडलं होतं. दोन पोरं खरंच गुणाची होती. भिवाचं साता–जन्मीचं पुण्य म्हणूनच ती त्याच्या पोटी आली होती. थोरला राघू स्वत:च्या हिमतीवर बी. ए. झाला होता. आणि कलेक्टर कचेरीत हुद्द्याच्या जागेवर होता. नाव्ह्याच्या घराचा चेहरा मोहराच त्याने बदलून टाकला. होता. धाकटा नारायण तर त्याच्याहून भारी होता. तो स्वत:च्या हुशारीवर शिकत होता. त्याला शिष्यवृत्ती मिळत होती. भावईला आपल्या दोन्ही पोराचा अभिमान होता. कौतुक होतं. भिवालाही होतं. पण त्याचं भावईसारखं नव्हतं. भावई आपल्या मुलावरून सर्वस्व ओवाळून टाकायला तयार होती. तिला त्यांच्यापुढं इतर काहीच दिसत नव्हतं. तसं भिवाचं नव्हतं. त्याच्या पूर्वायुष्यावर आणि त्यातील आठवणीवर त्याचं आयुष्य उभं होतं. आता मुलाच्या नशिबाने मिळालेल्या नवीन जीवनाचा तुकडा तो वेगळा करून पाहूच शकत नव्हता. ते सगळं आपल्या पूर्वायुष्याचाच भाग असला पाहिजे आणि त्याच्याशीच त्याची संगती असली पाहिजे. नव्या आयुष्यासाठी पूर्वीच्या आयुष्याशी ताटातूट होऊ द्यायची त्याची तयारी नव्हती.

आता त्याच्या मनात विचारांचा डोंब उसळला होता. राघूचं ऐकायचं का आपल्या रक्ताचं ऐकायचं ? त्याच्या पुढे गेले कित्येक दिवस हा मोठा पेच होता.

बराच वेळ भिंतीशी उभा राहून त्यानं विचार केला. पण त्यातून काही मार्ग सापडेना. उलट डोक्यात जास्तच गोंधळ होऊं लागला. तेव्हा भिवानं ओसरीवर टाकलेलं भाकरीचं गाठोडं उचललं. डाव्या काखेत धोकटी घातली. हातात काठी घेतली आणि पायात जोडा चढवून तो पायऱ्या उतरताना म्हणाला,

'मी निघालो !'

'आतून भावई काहीच बोलली नाही.

त्याचं त्याला वाईट वाटलं. भावईवर त्याचा फार जीव होता. बारा वर्षाची असताना ती त्याच्या संसारात आलेली होती. पन्नास वर्षे ती त्याला साथ देत होती. सावलीसारखी ती त्याच्या पाठीशी उभी होती. सुखात आणि दु:खात सारखीच.

आणि आज बाहेर पडताना तिचा शब्द आला नाही ! ती समोरसुद्धा आली नाही. त्याचे भिवाला फार वाईट वाटले. साऱ्या घरादारात आणि बाहेरही भावईइतकं जवळचं त्याला कोणीच नव्हतं.

विचारांच्या नादात त्याने गावची नदी ओलांडली. नदीला पाणी नव्हतं. फक्त ओले दगड गोटे होते. आणि दुतर्फा गच्च झाडी होती. चिलाराची थप्पी आणि लिंबा बाभळीच्या झाडाची रांग. समोरून एक पाद गेली होती. तिच्या दुतर्फा आडोळसा आणि करंजीची झाडं होती. भिवा आज किती तरी वर्षे या पांदीतून जात येत आला होता. प्रत्येक वेळा त्याला इथून चालताना नवी हुशारी वाटत आली होती. आडोळशाचा वास आणि सहवास त्याला फार आवडत होता. चालण्याचा वेग त्याचा या पांदीत आपोआपच मंद होत होता. आणि खेळत खेळत पानं खुडीत, आपल्या मनाशी रमत गमत तो ही पांद पार करीत होता.

परंतु आज त्याचं मन तसं प्रसन्न नव्हतं. पांदीच्या गार सावलीतून तो चालला होता. पण या जुन्या मैत्रिणीविषयी त्याला भान नव्हतं. सरा सरा चालत तो पांदीतून बाहेर पडला आणि चढाच्या रस्त्याला लागला.

कोवळी पिवळी उन्हं माळावर पसरली होती. सारी रानं निर्मनुष्य होती. ती नांगरून टाकलेली काळी कुळकुळीत रानं आणि फुंपाटयाने भरलेला रस्ता याशिवाय इतर काहीच नव्हतं. फक्त भिवाचं कुत्रं त्याला मागे साथ करीत होतं. धावत धावत ते पुढे एखाद्या उरळीपर्यंत पुढे जात होतं आणि जीभ बाहेर काढून भिवाच्या तिथपर्यंत येण्याची वाट पाहात होतं. हे कुत्रंही त्याच्या जिवाभावाचं होतं. त्याला रात्रीच्या अंधारात आणि मुसळधार पावसाच्या वेळीही त्या कुत्र्याने साथ दिली होती. आताही भिवाचं प्रथमच त्याच्याकडे लक्ष गेलं आणि त्याचं मन भरून आलं.

रस्ता चालताना भिवाच्या मनात गावाविषयी विचार येत होते. दादा पाटलाविषयी, भाऊ पाटलाविषयी आणि गेनू पाटलाविषयी विचार येत होते. हे तिन्ही गावचे पाटील आता अगदीच पोरसौदा होते. भिवाने त्यांचे वडील पाहिले होते. त्याच्या राज्यात भिवाचं आयुष्य गेलं होतं. आता ही पोरं राज्यकारभार हाकीत होती. त्याचं सारंच वेगळं होतं. त्याच्या मनाचा थाग कोणाला लागत नव्हता. आणि त्याची मायाही दिसून येत नव्हती.

एकदा भिवा असाच चुंभळीला चालला होता. आणि गावखोऱ्याजवळ आल्यावर एकदम घेरी येऊन पडला आणि बेशुद्ध झाला. तेव्हा दादा पाटलाचा बाप पाटीलकीवर होता. त्याला म्हाताऱ्याला हे कळलं. तेव्हा तो धावतच गावखोऱ्याजवळ आला. जातीनं कांदा फोडून नाकाला लावला. झटकन गाडी जोडायला सांगितली आणि भिवाला गाडीत घालून तालुक्याच्या गावाला दवाखान्यात घेऊन गेला. दोन तीन दिवस त्याने जातीनं भिवाच्या आजारपणात लक्ष घातलं. भिवा पूर्ण बरा झाल्यावर त्याच्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला होता.

'बला टळली बाबा ! काळ आला व्हता पर येळ नव्हती आली. जा आपल्या कामाला

लाग ? आता मस म्हातारा जख्ख होईस्तवर जगशील !'

भिवाला ही आठवण झाली आणि म्हातारा पाटील त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला.

तशाच कुलकर्ण्यांच्या काकू. फार माया केली त्यांनी. हो तिन्ही. गावं म्हणजे जणू आपलंच घर वाटत होतं त्याला. आणि थोरला राघू म्हणतोय आता समदं बिऱ्हाडच बिडास नेऊ म्हणून !

भिवाला त्याचा काही अर्थच कळत नव्हता. ही एवढी मोठी गावं आणि माणसांचा गोतावळा टाकून कुठं जायचं ?

गाव जवळ जवळ येऊ लागला, तसतसं भिवाचं मन उत्साहानं भरून येऊ लागलं. तो सकाळचं बायकोशी झालेलं सारं बोलणं विसरून गेला. आपल्या दोन मुलांचाही त्याला विसर पडला. पागरीच्या फाट्यावर त्याला जनोबा गुरव आडवा आला. तोही चुंभळीलाच चालला होता. त्यांच्या पाठीवर पळसांच्या पानाचं फुगीर गाठोडं होतं. मोठ्या सकाळीच डोंगरात जाऊन त्याने पानं खुडली होती. आज दुपारभर चावडीत बसून तो पाटील-कुलकर्ण्यासाठी पत्रावळी लावणार होता आणि कुलकर्ण्यांकडे दुपार जेवण करून संध्याकाळी वाडीच्या वस्तीवर जाणार होता.

हा त्याचा कार्यक्रम आज कित्येक वर्षे चालू होता. भिवाची भेट झाल्यावर जनोबा त्याच्याकडे पाहून हसला. त्याच्याकडे पाहून म्हणाला.

'काय भिवा, लेका तु आता तरी शिरीमंत झालाय !'

भिवाला त्याचं बोलणं समजलं नाही. आपण शिरीमंत कसे होणार ? आपल्यात काय बदल झालाय ? त्याला काही कळेना.

'काही तरी काय बोलतूस जना ?'

'बघा बा ? काही तरी काय ? लेका तुझी दोन्ही पोरं लयी मोठ्ठी झाली. आपल्या या दोन्ही तिन्ही गावात मावेनाशी झाली. केवढं नशीब बा तुझं ?

'म्हंजे काय झालं जना. त्येचं मला काय व्होवं ?'

'मस घर भरत्येल की आता ? तुझ्या त्या मोडक्या तोडक्या घरात बी मावणार न्हाई ही लक्ष्मी बघ ?'

'घरात कुठली आनत्यात ते लक्ष्मी. आम्हालाच म्हनत्यात बिडास्नी चला म्हून.'

'आरं मग तर सोन्याहून पिवळं ?'

या जनोबाच्या आणि आपल्या बायकापोरांना काय झालंय हेच भिवाला समजेना. बिडात कसं काय राहायचं ? ते केवढं मोठं अफाट शहर ? बघावं तिकडं माणसंच माणसं ! मोठमोठाल्या इमारती. दुकानाच्या थप्प्या. त्यातलं एक, दुकानदेखील आपल्या गावाला विकत घेता येणार नाही ! आणि ती गावाला फोडून मधोमध वाहणारी बेणसुरा नदी ! सडका, मोटारी आन् सायकली आणि अखंड माणसांचा गोंगाट. एखादे दिवशी जरी भिवा बिडाला गेला तरी त्याचं मन गांगरून जात होतं. ससासारख भित्र्या धापा टाकीत होतं. तिथं कोण कोणाला ओळखतंय ? सारी माणसं जणू अनोळखीच. कुणाशी बोलाव, कुणाबरोबर चालाव, कुणाबरोबर जेवावं ? काहीच सुचत नाही तिथं ! सगळं परकं परकं वाटतं. पाण्यातून बाहेर काढलेल्या माशागत.

गावापासून थोड्याच अंतरावर असलेला विस्तीर्ण वड भिवाच्या नजरेत भरला. आणि डोळ्यात एकदम गारवा दाटून आला. त्याला आठवलं होतं तेव्हापासून हा वड त्याला असाच दिसत आला होता. लहानपणी या वडावर तो सूरपारंबा खेळला होता. वडाच्या खोडाआड लपून जणू स्वत.लाच चोरून विड्या ओढल्या होत्या, इथं भर उन्हाचा त्याला एकदा चकवा आला होता. गाव हाकेच्या अतरावर असूनदेखील गावानं त्याला चुकविलं होतं. आणि आजूबाजूला मैल मैल तो भटकत राहिला होता.जेव्हा चकव्याची बहार गेली आणि तो पूर्ण भानावर आला तेव्हा दुरूनच याच वडाच्या झाडाने त्याला दर्शन दिलं होतं ! हिरव्या गर्द आपुलकीनं त्याला आपल्याजवळ बोलावलं होतं. एखाद्या लहान मुलानं आपल्या आईकडे धावत धावत जावं तसा तो या वडाच्या झाडाकडे धावला होता. त्याच्या बुध्याला मिठी मारून शांत शांत झाला होता. तेव्हापासुन तो त्याच्या जिवाभावाचा मित्र झाला होता !

वडाच्या पारंब्याना त्याने दोनचार वेळा हलविलं आणि तो पुढं निघाला. चुंभळी हे बुरुजाचं गाव. पांढऱ्या मातीचे गावात चारपाच बुरुज आहेत. त्यांची अपूर्वाई वेगळीच वाटते. त्या कोरड्या मातीच्या बुरुजावर पिंपळाची लहान लहान झाडं उगवलेली आहेत. या उघड्या बोडक्या कोरड्या मातीत ते मूळ धरून नेहमी कसे टवटवीत राहतात याचं भिवाला नेहमीच नवल वाटत आलेलं आहे ! ती झाडं भिवाच्या जिवाभावाची आहेत.

'बघ की ते पिंपळ कसे हिरवेगार दिसत्यात त्या कोरड्या मातीवर ?' भिवा जनोबाकडे पाहून म्हणाला. पण जनोबाला त्याचं काहीच वाटलं नाही.

'आरं मी ही पळसाची पानं आणतो डोंगरातून ते हिरवीगारच असत्यात की ? डोंगरावर काय बारा महिनं पानी असतंय काय ?ही समदी देवाची करणी हाय बाबा!' म्हणत जनोबा चावडीकडे वळला आणि भिवाने पाटलाच्या वाड्याची वाट धरली.

पाटील टाळजेत तक्क्याला टेकून बसले होते. भिवाने त्यांना रामराम घातला.

'लयी येळ केलास रे आज ?' पाटलानं विचारल. भिवा त्यांना काय उत्तर देणार ? त्याला सकाळचा सारा प्रसंग आठवला.

झटपट सारी तयारी करून त्याने पाटलाचं डोस्कं हातात घेतल आणि इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत त्याने मन लावून पाटलाची हजामत केली, बगला, छातीवरचे केस साफ करून त्याने पाटलाचा चेहरा केला आणि बगला धरून पाठ चोळली. मान मोडून सारं अंग मोकळं केलं. आणि तो जायला निघाला तशी पाटील म्हणाला,

'गावाकडं जायच्या अगूदर घरी येऊन जा. तुझ्यापाशी बोलायचंय जरा !'

'भिवा 'बरं' म्हणाला आणि वाड्याबाहेर पडला, दुपार टळेपर्यंत तो गावात कामं उरकीत राहिला.

आता त्याच्यानं पहिल्यासारखं काम होत नव्हतं. मान भरून यायची, हाताला कळ लागायची. डोळ्यातून अधूनमधून पाणी यायचं. पण हे काम केल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. त्यावर इतर काही उपायही नव्हते. परंतु भिवाच्यानं जरी हे काम आता होत नव्हतं तरी त्याला कामाची आवड होती. त्याचा पिंडच त्यावर जगला होता. शिवाय या कामाच्या निमित्तानं वयात आलेल्या प्रत्येक माणसाशी बोलायची, त्याच्या मनात शिरायची, त्याचं सुखदुःख जाणून घ्याय ची,

आपलं पोट मोकळं करायची संधी त्याला मिळत होती. जणू या निमित्तानं तिन्ही गावाचे लोक त्याचे नातेवाईक झालेले होते. त्याचा जीव त्यांच्यात गुंतला होता.

दिवस कलल्यावर त्याचं सारं काम आटोपलं. मग तो मळ्यातल्या विहिरीवर गेला. तिथं त्याने मोटाच्या पाण्यानं हात, पाय, तोंड स्वच्छ धुतलं. लगेच त्यामुळे त्याला किती तरी ताजंतवानं वाटू लागलं. मग धावेच्या बाजूला एका झाडाखाली त्याने भाकर खाल्ली. एक मस्तपैकी ढेकर दिला आणि पोटभर पाणी प्याला.

आता त्याला चांगली हुशारी वाटू लागली होती. मग एकाएकी पाटलाने बोलावल्याची त्याला आठवण झाली. आणि मोठ्या उत्साहात तो पाटलाच्या वाड्यात आला. पाटील तक्क्याला टेकून बसले होते. त्यांची नुकतीच दुपारची झोप झालेली दिसत होती. डोळे जड वाटत होते. आणि चेहरा बोजड दिसत होता.

'बस, भिवा' खोल आवाजात ते म्हणाले.

भिवा तिथंच जोत्यावर टेकला.

'काय म्हणत्यात तुझी पोरं ?'

'चांगली हायत की–'

'धाकटा कव्हा डाक्टर होणार ?'

'म्होरल्या साली हुईल !'

'सारे पांग फिटले गड्या तुझे !'

'त्येचं आपल्याला काय होवं मालक ?'

'काय बरं ?'

'त्येचं काय भाग्य त्येंच्या जवळ, आपलं नशीब आपल्याजवळ !'

'आरं पर आता तू म्हातारा झालास. तुझी बाईल बी थकत आली ! तुमच्या म्हाताऱ्याच्या दोन काठ्या नव्हत का त्या ! भाकर तुकडा आन निवारा त्येंच्या जवळच की तुझा !'

'न्हाई मालक, आपलं समदं ह्या गावातच हाय. गाव आन गावचा राजा माझी भाकरी देतो. मी बलुतंदार हाय हितला !

भिवाचा म्हातारा चेहरा अभिमानानं फुलून आला. मध्येच एखादी चांदणी चमकली तसे त्याच्या तोंडावरचे देवीचे वण चमकत होते. पाटील बराच वेळ त्याच्याकडे बघतच राहिले. त्यांच्याही मनात चलबिचल चालली होती. शेवटी जड आवाजात ते म्हणाले,

'भिवा तू आता म्हातारा झालास !'


'व्हय मालक !'

'आता तुझ्याच्यानं काम व्हायचं नाही. तुझे पोरं तर गाव सोडून गेले. तू गावचा शेवटचा खुंट. त्योबी आता वठत आला. गावात न्हावी तर पाहिजे. तेव्हा आता बाहेरून न्हावी आणीत आहोत.'

पाटलाच्या बोलण्याचा भिवाच्या मनाला फटकारा बसला. त्याच्या डोळ्यासमोर काजवे चमकले. पाटील नाही, पण धरणीच आपल्याला उचलून फेकीत आहे असा त्याला भास झाला. या मातीतूनच तो वर आला होता. सारा जन्म तो इथंच एखाद्या प्रचंड झाडासारखा विस्तारत राहिला होता. आणि आता त्याच्या मुळावरच घाव बसला होता– आता कुठं जावं ? पोराचं घर–ते शहर–ते काही आपलं नाही. हा सारा परिसर, इथलं ऊन, पाऊस, वारा, वादळ सारं आपलं आहे. इथल्याच मातीतून आपण वर आलो आणि इथलीच माती आपल्याला पोटात घेणार आहे ! पण आता तर पाटलाच्या रूपानं मातीतच पदर ओढून घेतला. आपली झोपडी, आपलं अंगणासमोरचं ते लिंबाचं झाड. काहीच आपलं नव्हतं काय ? मग आपलं काय होतं ? कोण होतं ?

भिवाच्या डोक्यातून एक मोठी कळ आली. आणि दुसऱ्याच क्षणाला त्याच्या डोळ्यातून अश्रुधारा सुरू झाल्या. □


# तिसरी आवृत्ती



## सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# २५ जून ७५....

# सौराठ सभा

सुमन बंग

विसाव्या शतकातही आज बिहारमधील मधुबनी जिल्ह्यात दरवर्षी 'सौराठ सभा' होत असते. यास 'सभीगाछी'ही म्हणतात. 'गाछी' म्हणजे झाड. शेकडो आब्यांच्या झाडाखाली होणारी ही सभा म्हणजे एक आश्चर्यच आहे. साधारणपणे दहा दिवस ही सभा चालते. जूनचा महिना विशेष सोयीचा. देशभर नव्हे जगभर पसरलेल्या मैथिली समाजाने फार चांगल्या हेतूने बहुधा ही परंपरा चालू केली असेल; पण आज तिला फारच विकृत स्वरूप आलेले आहे. भारतात साधारणपणे उन्हाळ्यात लग्नसराई असते. मुलीचे पालक वरांच्या शोधात दौरे करीत वणवण हिंडतात. मुलांकडचे लोक मुलीला बघायला येतात. आतिथ्यात भरमसाट खर्च मुलीकडच्याला करावा लागतो. अखेर लग्न जुळेलच याची काही खात्री नसते. कदाचित ह्या त्रासापासून मुक्ती व्हावी म्हणून सौराठ सभेचा जन्म झाला असेल. भारतात ज्यांना लग्न करायचे असते त्यांच्या पसंतीचा किंवा संमतीचा फारसा प्रश्न नसतो. पालकांनीच ते सर्व बघायचे असते. आपल्या मुलांमुलींच्या आवडी-निवडी, वृत्ती, आशा-आकांक्षा ओळखून व आपली शक्ती पाहून लग्न जुळवायचे असते. आजकाल पूर्वीसारखे राहिले नाही. पैसा सर्वांत महत्त्वाची बाब बनला आहे. मुलगी कितीही शिकलेली, गुणवान, सुदृढ, सुस्वरूप असो. हुंडा द्यावाच लागतो. उलट साधारणपणे अनुभव असा आहे की वरील गुण जितके मुलीत जास्त तितका हुंडा जास्त, कारण जोडीला मुलगाही तसाच नव्हे तिच्यापेक्षाही वरचढ हवा ना! मुलीच्या बापाची आर्थिक शक्ती जेवढी जास्त तेवढा अधिक चांगला मुलगा मिळण्याची शक्यता; असे आज समीकरण बनले आहे. मुलगी गौण; अर्थ प्रधान.

'सौराठ सभा' किंवा सभागाछी हे खरे म्हणजे मुलामुलींचे लग्न जुळवायचे पवित्र स्थान; पण आज त्याला बाजाराचे, व्यापाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. घनदाट आमराई असलेली ही जागा दहा दिवस माणसानी गजबजलेली असते. विकणारे व खरेदी करणारे याचे हे मीलन स्थान. दुकान थाटावे तसे मुलांचे पालक तंबू लावून गाद्या गिरद्यावर किंवा टेबल खुर्च्यावर बसून असतात. लग्नासाठी तयार असलेल्या आपल्या मुलाला सजवून बसवलेले असते. देशभरातूनच नव्हे तर जगातील सर्व भागातून उपवर तरुण, त्याचे पालक व मुलीचे पुरुष पालक मिळून जवळ जवळ दीड दोन लाखांचा हा समाज असतो. लग्न जुळविणारे मधलोबा सारखे इकडून तिकडे माहिती पुरविण्याचे काम करीत असतात. मुलाची किंमत व आपली कुवत पाहून मुलीचा बाप मुलाकडे येतो व मुलगा पसंत पडण्याचा फारसा प्रश्न नसतो. आपल्या खिशाला परवडण्यासारखा मुलगा पाहून सौदा पक्का होतो. सौदा पटल्याबरोबर मिळेल त्या वाहनाने (तेथे रीक्षा, टांगे, टॅक्सी इ. वाहने तयारच असतात) मुलीचा बाप त्या मुलाला आपल्या घरी नेतो व ताबडतोब त्याच्याशी आपल्या मुलीचे लग्न लावतो. केवळ कुटुंबातील सदस्यांच्या उपस्थितीत लागलेल्या या लग्नास मुहूर्त शोधून काही दिवसानी सामाजिक सोहळ्याचे स्वरूप दिले जाते व मोठ्या थाटात लग्न पार पडते. तोपर्यंत मुलगा मुलीकडेच विवाहित जीवन जगतो. मुलीच्या बापाने मुहूर्त पाहून लग्न लावण्यापूर्वीच असे तातडीचे लग्न का केले असा प्रश्न निर्माण होतो त्याचे उत्तर सरळ आहे. मुलीचा बाप मुहूर्तासाठी थाबला व लग्न लांबणीवर टाकले तर पटलेला सौदा फिसकटण्याची त्याला सारखी भीती वाटते. त्याने दिलेल्या हुंड्याच्या रकमेपेक्षा कुणी मुलीचा बाप जास्त रक्कम देण्यास तयार झाला तर मुलाचा बाप बदलू शकतो हा व्यावहारिक मुद्दा लक्षात घेऊन ही त्वरित लग्नाची युक्ती सुचली असावी. केवढी केविलवाणी स्थिती आहे ही!

## स्त्रीला प्रवेशबंदी

मुलामुलींची लग्ने येथे जुळतात. पण आश्चर्याची गोष्ट ही की या सौराठ सभेचा कडक नियम आहे की कुणाही स्त्रीने प्रवेश करता कामा नये. त्यामुळे कुणीही स्त्री या लाखाच्या मेळाव्यात दिसणार नाही. आणीबाणी लागण्यापूर्वी या ठिकाणी हुंडाविरोधी आदोलन करण्याचे आम्ही ठरवल्याचे जेव्हा मधुबनीच्या कलेक्टरला समजले तेव्हा ते आम्हाला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करू लागले. मैथिली तरुण सौराठ सभेत स्त्रियांचा प्रवेश मुळीच सहन करणार नाहीत, तुम्ही स्त्रिया तेथे जाल तर तुम्हाला दगडधोंड्यांनी ते ठेचून काढतील अशी भीती व्यक्त करून आपला अनुभव त्यानी सांगितला. ते म्हणाले, माझ्या पत्नीला सौराठ सभा बघण्याची फार उत्सुकता होती. म्हणून गतवर्षी मी तिला मोटारीत बसवून सौराठ सभेतून केवळ फिरवून आणण्याचे ठरवले. सौराठ सभेच्या सीमेवरच मैथिली तरुणांनी माझी गाडी अडवली व पत्नीस सोबत नेण्यास विरोध केला. अखेर तेथील विश्रामगृहात थाबून दुरूनच तिला बघता आले. आत ती जाऊ शकली नाही. तेथे स्त्री प्रवेश निषिद्ध मानला गेला आहे व कटाक्षाने त्याचे पालनही होते.

## बिहार आंदोलनाचा एक पैलू

बिहार आंदोलनाच्या वेळी महिला आघाडीचे काम जयप्रकाशजींनी माझ्यावर सोपविले तेव्हा या गोष्टीचा प्रतिकार करण्याचे आम्ही ठरवले. बिहार आदोलनात सामील झालेल्या आम्ही सर्व भगिनी एकत्र जमलो. त्याच जिल्ह्यातील अनेक मैथिली ब्राह्मण कुटुंबातील महिलाना आम्ही तयार केले. बिहारमधील काही मैथिली पुरुष मंडळींनीही आम्हाला साथ दिली व सौराठ सभेत आम्ही महिलांनी जाऊन हुंडाविरोधी वातावरण तयार करण्याचे ठरविले पोस्टर्स, पत्रके, पुस्तके, प्रतिज्ञापत्रके याच्या मदतीने संघर्षवाहिनीच्या तरुणांनी सौराठ सभेत वातावरण अनुकूल बनविण्याचा प्रयत्न केला व ता. २५ जून ७५ रोजी आम्ही पन्नास स्त्रिया व पंचवीस तीस पुरुषानी मिळून सौराठ सभेत मिरवणूक काढली व जंगी सभाही घेतली. मैथिली तरुणांनी खूप धमक्या दिल्या. लाठ्या, दगड, विटा इत्यादी घेऊन ते जय्यत तयारीनिशी आले होते. आमच्या विरुद्ध घाणेरड्या घोषणाही त्यानी दिल्या; पण आमचा दृढ निश्चय व कलेक्टरची उत्तम पोलिस व्यवस्था यापुढे त्यांना नमावे लागले. आमच्या मिरवणुकीचा व सभेचा खूप चांगला प्रभाव पडला. अनेकांनी हुंडा न घेण्याची प्रतिज्ञा घेतली. परिणामतः बिना हुंड्याची अनेक लग्ने त्या दिवशी जुळली. दहा दिवस सतत प्रचार, मिरवणूक, सभा, साहित्यविक्री आदी कार्यक्रम आम्ही करणार होतो; परंतु त्याच दिवशी २६ जून ७६ ला आणीबाणी घोषित झाली व आमचे ते स्वप्न सोबत घेऊनच आम्हाला मीसाबंदी व्हावे लागले.

['साम्ययोग' (२६।१।८०) अंकावरून साभार पुनर्मुद्रित] □

# पुस्तके

सतीश कामत

# बदनसीब

## खानदानी व्यक्तिमत्त्वाचे दर्दभरे जीवन

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही ! शंभर-सव्वाशे वर्षे सहज होऊन गेली असतील. त्यावेळी कंपनी सरकार हिंदुस्तानच्या सांदी-फटीतून आत शिरत होतं. शक्य होईल तिथे, वाट मिळेल तसं हात-पाय पसरत होतं, पकड बळकट करत होतं. 'खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल कंपनी सरकारका' हा प्रकार हळूहळू वाढतच चालला होता. पण कित्येकांच्या हे लक्षातच येत नव्हतं. काही जणांच्या येत होतं, पण त्याबद्दल काही करण्याची त्यांची तयारी नव्हती. उत्तर हिंदुस्तानात मात्र कंपनीसरकारचा हा कुटील डाव ओळखून त्याला शह देण्याचा विचार हळूहळू बळावू लागला. अशा विरोधी शक्ती संघटितही होऊ लागल्या आणि त्यातूनच बंडाची ठिणगी पडली.

बहादूरशहा हा वार्धक्याच्या छायेत वावरणारा बादशहा त्यावेळी दिल्लीचा शहेनशहा-ए आलम होता. ही राजवस्त्रं त्याला मिळाली तीच मुळी साठी उलटल्यानंतर. तीही सहजासहजी मिळाली नाहीत. ते करत असताना आणि नंतरही या कविमनाच्या शिपायाने अनेक शत्रू स्वतःभोवती निर्माण करून ठेवले. स्वतः उत्कृष्ट तलवारपटू व तिरंदाज असलेला अबू जफर आयुष्याच्या अंतकाळी मात्र स्वार्थी, लाचार व नादान माणसांच्या हातातला नामधारी बादशहा उरला होता., त्याला गझल-मैफलीचा शौक होता. नृत्य–संगीतात तो दर्दी होता, सौंदर्याचा उपासक होता, उत्कृष्ट लढवय्या होता. पण त्याच्या आयुष्याची अखेर परप्रांतात, शत्रूच्या कैदेत, शत्रूच्या मेहेरबानीने होणार होती. मृत्यूनंतर त्याने कुठे विश्रांती घ्यावी हे देखील ठरवण्याचा अधिकार त्याच्या शत्रूच्या हाती होता.

बादशहावर ही परिस्थिती ओढवण्याचं मुख्य कारण म्हणजे कंपनीसरकारच्या विरोधात तो उभा राहू पहात होता. खरे म्हणजे स्वतःहून उभं राहण्याची त्याची आता उमेद नव्हती. पण उत्तर हिंदुस्थानातल्या विविध भागांमधून सैनिकांचा ओघ दिल्लीकडे सुरू झाला. त्यांनी शेवटला फिरंगी मारला जाईपर्यंत विश्रांती न घेण्याचा विडाच उचलला होता. थकत चाललेला बादशहा न परवडणारे श्रम करून गलितगात्र होऊन जात होता. पण त्याचा पीळ फार काळ टिकू शकला नाही. कंपनीसरकारच्या कवायती पलटणींनी उत्तर हिंदुस्थानातल्या शिपायांचं हे बंड सहज मोडून काढलं आणि विकलांग अवस्थेत रंगूनमधल्या अखेरच्या काळात 'न किसीकी आँखका नूर हूँ, न किसीके दिलका करार हूँ जो किसीके काम न आ सके, मैं वो एक जुश्तेगुबार हूँ' असं म्हणत अंतकालाची वाट पाहणं बादशहाच्या नशिबी आलं. पण त्याच वेळी कुणी डिवचण्याचा प्रयत्न केला तर 'तख्ते लंदनपर चलेगी तेग हिंदोस्तानकी' असं वजावण्याचीही धमक त्या सुरकुतलेल्या शरीरात होती.

सौ. प्रतिभा रानडे यांनी लिहिलेल्या 'बदनसीब' या कादंबरीचा नायक असा आहे. १८५७ च्या धगधगत्या काळात सर्व शक्तिनिशी झगडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि अपयशी होऊन एखाद्या उल्केप्रमाणे कुणाच्याही नकळत विझून जाणाऱ्या बादशहाचं जीवनचरित्र असं आहे. त्याचं जीवन ज्या तऱ्हेनं घडत गेलं आणि ज्या तऱ्हेनं अस्तंगत झालं. ते पाहता 'बदनसीब' या पलीकडे कोणत्याच शब्दाने त्याचं समर्थन करता येणार नाही. कादंबरीच्या शीर्षकाची ही यथार्थता कादंबरी वाचताना वारंवार जाणवते. वाचून संपल्यावर मनात पक्की होते.

या कादंबरीचं आणखी एक वैशिष्टच म्हणजे यातल्या सर्वच प्रसंगाना असलेली सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वीची ऐतिहासिक पार्श्वभूमी. तशी पार्श्वभूमी निर्माण करून वाचकांना वर्तमान विसरायला लावणं हे एक फार मोठं आव्हान होते. लेखिकेने हे आव्हान यशस्वीपणे पेललं आहे. कोणताही प्रसंग उभा करताना त्याला त्या काळातल्या सामाजिक आणि आर्थिक संदर्भाची जोड द्यायला सौ. रानडे विसरलेल्या नाहीत. गजबजलेली बाजारपेठ, झुंबरं व चिरागदानांनी उजळून निघालेला दिवाणखाना, कंपनीसरकारच्या सैन्याशी शिपायांची ठिकठिकाणी झालेली तुंबळ लढाई किंवा नावेतून रंगूनच्या दिशेने वाटचाल करत असताना लाटांवर तरंगणारी चांदणी–रात्र ही सर्वच स्थळं आणि प्रसंग लेखिकेने अत्यंत प्रभावीपणे वाचकांसमोर उभे केले आहेत आणि या सगळ्यांना खानदानी उर्दू शब्द व शायरीची मिळालेली जोड लक्षणीय आहे. एखाद्या चित्रपटामध्ये जसे स्वतःची लांबी, रुंदी आणि खोली असणारे प्रसंग पडद्यावर येतात आणि आपला ठसा उमटवून जातात तसं या

कादंबरीतल्या प्रसंगाचं आहे. ते स्वतंत्रपणे येतात. स्वतःचा असा स्वतंत्र ठसा उमटवून अंतर्धानिही पावतात. पण एका खानदानी व्यक्तिमत्त्वाचं दर्दभरंजीवन एकसंधपणे साकार होतं.

सौ. रानडे यांचीच 'माणूस'मध्येच प्रसिद्ध झालेली अफगाणिस्तानवरील उत्कृष्ट लेखमाला वाचताना असं वाटायचं की या लेखिकेजवळ सांगण्यासारखं खूप काही आहे, पण ते फुलवण्याचं बळ तिच्या लेखणीत नसावं. 'बदनसीब' वाचल्यानंतर तो गैर-समज काही अंशी दूर होतो. आयुष्याच्या अखेरीस वादळाला एकाकीपणे झुंजणारा एक अस्सल भारतीय 'किंग लियर' उभा करण्यात सौ. रानडे इथे निश्चितच यशस्वी झाल्या आहेत.

*

**बदनसीब**

ले.–सौ. प्रतिभा रानडे
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
पृष्ठे–२५१, किंमत सोळा रुपये

---

## फिनिक्स निवड

---

# Zen and the Art of Motorcycle Maintenance

**By Robert M. Pirsig**
(Corgi Books, Pages 406, £ 1-25)

---

गेडोर, वॅहको–तपारियाचे पाने, तेवीस नं. रेंच, अंबूर, करवत, हेक-सॉ, की, सार्त्रंचा अस्तित्ववाद, सनातनी धर्म, झेन, रॅशनॅलिझम ?–थोडक्यात म्हणजे विज्ञान व अध्यात्मवाद या दोहोत सध्या जो वाद सुरू आहे त्यामधील एक सुवर्णमध्य या लेखकाने सुचवला आहे. मुखपृष्ठावरच एकीकडे १६ नंबरचा पाना व दुसरीकडे नाशवंत, सुंदर फूल असे चित्र दाखवले आहे. पुस्तकाचे नाव आणि चित्र हे दोन्ही असाधारण आहेत.

आधी मला पुस्तकाच्या नावावरून असे वाटले की, फटफटीच्या तंत्रावर हे पुस्तक आहे, पण टूल (Tool) आणि फूल (flower) हे चित्र बघून थोडा सरसावलो. अर्थात झेन या शब्दावरून थोडीशी तत्त्व-ज्ञानाची कल्पना येते. पण पुस्तकाच्या नावाच्या वैचित्र्यामुळे झेन हा शब्द पार्श्व-भूमीत लोटला जातो. कारण या पाश्चात्य देशाच्या पुस्तकाची नावे आणि इलस्ट्रेशन्स या दोन्ही कधी कधी फसव्या असतात. कधी कधी तर चक्क गैरलागू असतात. त्या इतक्या की, शेवटी आपल्याला विचार पडतो की, 'अरे या पुस्तकाचा नावाशी काय संबंध आहे? जाऊ दे, हे अमेरिकन फॅडिस्ट असेच.' असे म्हणून आपण प्रकरण निका-लात काढतो. पण आपण अधिक खोल विचार केला तर असे आढळून येईल की, अर्थ कुठे तरी 'बिटवीन द लाईन्स'मध्ये असतो.

रॉबर्ट पिरसीग व प्रकाशक तर असा दावा करतात की, या पुस्तकाने तुमचा जीवनाविषयीचा दृष्टिकोनच बदलून जाईल. बदलत्या नीतिमूल्यांच्या जगात या पुस्तकाचा फारच उपयोग होईल असे बऱ्याच प्रख्यात लेखकांनी सांगितले आहे.

शरीराचे व मनाचे आत्मवृत्त, मनाची विश्वात केलेली एक सफर, अशा तऱ्हेचे वाचन आपण आधी केलेलेच नाही. एक मूर्तिभंजक डिटेक्टिव्ह स्टोरी, मोटार साय-कलवर प्रेम करायला लावणारे पुस्तक वगैरे दावे पुस्तकाच्या पहिल्या दोन पानावर आहेत. इंग्रजी पुस्तकाच्या मलपृष्ठाच्या मागील बाजूस पुस्तकाविषयी थोडीशी माहिती तर लिहिलेली असतेच, पण मी आधी सांगितल्याप्रमाणे एक-दोन शब्दात वर्गीकरणही दिलेले असते. त्याशिवाय सिनेमा बघण्यापूर्वी जसे टाईटल्स असतात तसे काही पुस्तकात त्या त्या पुस्तकाविषयी नामांकित नियतकालिकाची व व्यक्तीची मतेही (अर्थात अनुकूल तेवढी) असतात. हे सर्व वाचून जवळजवळ दोनेक मिनिटांतच पुस्तक कोणत्या विषयावर आहे, आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीने कोणत्या क्षेत्रात विशेष कामगिरी केली वगैरे गोष्टींचा सुगावा लागतो. परंतु हजारो पुस्तके लावलेल्या रांगेतून पुस्तके निवडताना आपल्याला प्रत्येक पुस्तकाला दोन मिनिटेही देणे होत नाही. त्यामुळेच आपल्याला माहिती असलेल्या पुस्तकाच्या नावावरून किंवा आपल्या आव-डीच्या लेखकाच्या नावावरून आपण पुस्तक निवडतो. हे असे करताना एखादे वेळी एखादे उत्कृष्ट पुस्तक हुकण्याचा संभव असतो.

या पुस्तकाचे पिरसीगने On inquiry into values असे सबटाईटल दिले आहे. अलीकडे नीतिमूल्ये झपाट्याने बदलत चालली आहेत. तरुण पिढीला जुन्या मूल्याच्या बदली नवीन मिळाली नाहीत, त्यामुळे त्याच्यात पोकळी निर्माण झाली आहे वगैरे गोष्टी आपण अनेकदा ऐकतो. कुणी तरी मग ही पोकळी भरून काढण्या-साठी पुस्तके लिहितो, भाषणे देतो, लेख लिहितो, सेमीनार भरवतो. पण या सर्व जंगलातील हैराण आरोळ्या (cries in wilderness) ठरतात. नीतिमूल्याचे प्रश्न परत परत उपस्थित केले जातात आणि या cries in wilderness मुळेच की काय ते प्रश्न आणखीनच बिकट होत जातात. क्वचित प्रसंगी एखाद्या रॉबिन्सन क्रुसोला असल्या प्रयत्नातून प्रेरणा मिळते आणि त्याचे जीवन फुलासारखे दरवळून निघते. तर काही फक्त असल्या रॉबिन्सन क्रुसोकडे nostalgia ने बघतो. पण बहुतेकांना असले प्रयत्न म्हणजे एक बकवास वाटतो.

हे पुस्तक म्हणजे लेखकाने केलेले फट-फटीवरचे भ्रमण. परंतु या भ्रमणापेक्षा पुस्तकात महत्त्वाची आहेत ती भरपूर चिंतने, निरीक्षणे. भ्रमणे, चिंतने, निरीक्षणे व फट-फटी यांचा संगम इतका बेमालूमपणे झाला आहे की, शेवटी शेवटी आपल्याला वाटते की, श्री. पिरसीगचे शारीरिक व मानसिक यंत्र व फटफटीचे तांत्रिक यंत्र यांच्यात एक ट्यून निर्माण झाला आहे.

मी स्कूटरवरून पुष्कळ वेळा हायवेवर गेलो आहे. क्वचित प्रसंगी कारने व बसनेही गेलो आहे. आगगाडी, बस किंवा मोटारीच्या प्रवासापेक्षा स्कूटरवर उघडं बोडकं हिंड-ण्याची एक वेगळीच धुंदी असते. श्री. पिरसीग तर कारमध्ये हिंडायचे म्हणजे आणखीन थोडा टी. व्ही. बघायचा असे म्हणतात. मोटारीला जी चौकट असते तिला लेखक TV स्क्रीनची उपमा देतात! मोटा-रीच्या खिडकीरूपी TV च्या स्क्रीनवरच

लॅन्डस्केप भराभर धावतो. परंतु मोटारसायकलवर केवढा मोठा देखावा नजरेस पडतो. मी पावसाळ्यात स्कूटरवर हायवेवर गेलो असता दृश्य इतकं अंधुक झालं की, रस्ता कधी बारीक रिबनसारखा वाटे तर कधी सर्पासारखा वाटे. पण पुष्कळवेळ वाहन चालवल्यानंतर स्कूटरच्या इंजिनच्या आवाजात व धूसर वातावरणात जणू या जगात एकच सत्य आहे असे वाटे. ते म्हणजे रस्ता. बाकी सब झूठ. इलूझन आणि डोंगर प्रोफाईल्स बदलतात. जवळून लांबून अगदी बहुरूपीसारखा वेष बदलतात, हे सर्व दुचाकी वाहनावरून वेगळेच दिसते. स्नानाआधी रस्ता गोरा-करडा दिसे, पण स्नानानंतर काळाशार! एकदा तर मी पार फसलो! धूसर वातावरणात आकाशात डोंगराची रांगच रांग दिसायला लागली. पण बारकाईने निरीक्षण केल्यानंतर आढळले ही तर मेघाची आऊटलाईन! चित्रकाराच्या भाषेत सांगायचे तर खरंच पावसाळ्यात लॅंडस्केप कधी-रीआलिस्टिक, कधी सररीआलिस्टिक कधी क्युबीस्ट, कधी पॉइंटीलिस्टिक व कधी एब्सट्रेक्ट दिसतो. ज्याना सोसवत असेल त्यांनी प्रवास छताशिवायच करावा. दुचाकी वाहनात तुम्ही लॅन्डस्केप बघत नाही, तर लॅन्डस्केपमध्ये मिसळून जाता.

हे पुस्तक वाचताना श्री. अशोककुमार स्वामीनारायणांच्या 'फटफटीवरून भारतभ्रमण' या पुस्तकाची आठवण येते. १९७० साली मी हे पुस्तक वाचले होते. श्री. स्वामीनारायण यांनी २३००० मैल प्रवास करून सारा हिंदुस्थान पालथा घातला होता. एक लाख रुपये खर्चून सबंध जगाचा ते पुढे प्रवास करणार होते असे २१-३-१९७० च्या सकाळमध्ये वाचले होते.

आपले 'महाराष्ट्र टाईम्स' जसे दर वर्षी 'मी वाचलेली उत्तम पुस्तके' असे सदर देते, तसे टाईम मासिकात सुद्धा इयर्स बेस्ट बुक्स, सिनेमा, म्युझिक अशी यादी असते. त्याशिवाय प्रत्येक दशकातली उत्तम पुस्तके, सिनेमा वगैरे अशी यादीही असते. श्री. रॉबर्ट पिरसीग याचे सदर पुस्तकही 'द बेस्ट ऑफ द सेव्हंटीज' या यादीत आहे आणि या यादीत गुलाग आर्चिपेलॅगो, मायकेल हर चे डिस्पॅचेस, द लाईव्हज् ऑफ अ सेल, आयझेक बॅशेविस सिंगरचे (नोबेल पारितोषिक विजेता) शोशा, रॅगटाईम, द वर्ल्ड अॅकॉर्डिंग टू गार्प वगैरे पुस्तके आहेत. मला आठवते, कॅच-२२ चे नावही ६० ते ७० या दशकात आले होते.

या पुस्तकात trivia फार आहे. शब्दांच्या काटकसरीमुळे लिखाणात जी एक प्रकारची धार असते ती यात नाही. परंतु विचारांची खोली निश्चित आहे. कधी कधी अशी शंका येते की, trivia लिहिण्याचा हेतू कदाचित मजकुरात एक प्रकारचे अंडरस्टेटमेंट यावे यासाठी असे. ते काहीही असो. पण हेमिंग्वेपासून बऱ्याच अमेरिकन लेखकांनी जी अंडरस्टेटमेंट करण्याची शैली उचलली ती कुणालाच जमली नाही.

थोडक्यात म्हणजे हे पुस्तक anti-technological आहे. आत्म-प्रबोधनासाठी केलेले भ्रमण आहे. टेक्नॉलॉजी म्हणजे माणसाला गिळंकृत करणारा एक प्रचंड ड्रॅगनच आहे अशा आशयाने या पुस्तकातील पात्रे त्याला IT म्हणून संबोधतात. पण ज्या टेक्नॉलॉजीने लेखकाला भटकायला मोटरसायकल दिली तिच्यावर लेखक कमालीचे उत्कट प्रेम करतो. अमेरिकन लोकांचे राहणीमान पाहिले, त्याचा एकादा सिनेमा पाहिला किंवा मासिकात त्यांच्या घराचे फोटो पाहिले की, आपल्या पूर्वीच्या संस्थानिकांच्या किंवा सध्याच्या नं. २ च्या लोकांच्या राहणीमानाची आठवण येते. एकदा कुठेतरी असे वाचल्याचे आठवते की, नुसत्या USA च्या wastage वर एक मोठा गरीब देश सहज जगू शकेल. जेव्हा टेक्नॉलॉजी पुऱ्या वेगाने पुढे जाऊ लागली तेव्हा यॅंकीना काय किंवा पृथ्वीच्या सर्व देशांना काय, गोदो आता येईल अशी आशा वाटत होती. गोदो तर आला नाहीच; पण टेक्नॉलॉजीने मिळवून दिलेल्या अफाट पैशाने विकसित राष्ट्राला पोखरून काढले व ही राष्ट्रे आता waiting for Godot मधील ट्रॅम्प्स सारखीच गोदोची (Happiness) वाट बघत आहेत. अर्थात् गोदो कधी येतच नाही. हा गोदो पौर्वात्य देशात येईल असेही नाही. Technology, wait for Godat. Wait till perdition.

—जे. एन्. पोंडा

---


**गेल्या दशकामधील (Seventies) 'टाईम' मासिकाने उत्तमोत्तम म्हणून निवडलेली खालील पुस्तके आम्ही आधीच विकत घेतली होती**

**Fiction :**
1. Gravity's Rainbow – By Thomas Pinchon.
2. Humboldt's Gift – Saul Bellow
3. Ragtime – E. L. Doctorow
4. The World According To Garp – John Irving

**Nonfiction :**
1. Dispatches – Michael Herr.
2. Gulag Archipelago – Alexander Solzhenitsyn.
3. Zen and the Art of Motorcycle Maintenance – Robert M. Pirsig.

**Picture Stories :**
1. Last Tango In Paris – Robert Alley.
2. Distant Thunder – Olivia O' Neill.
3. Godfather – Mario Puzo.
4. Barry Lyndon – William Makepeace Thackeray.
5. Star wars – George Lucas.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

## पुणे वार्ता

# भारतीय पत्रकारितेची दोनशे वर्षे

परवा जेम्स लिकीची आठवण पुन्हा एकदा आली. जर्नालिझमला शिकत असताना जेम्स लिकीची सारी माहिती तोडपाठ केली होती; पण परवा म्हणजे २९ जानेवारीला मात्र त्याची पुन्हा आठवण झाली. याचं कारणही तसंच होतं. भारतीय पत्रकारितेला २९ जानेवारीला २०० वर्षे पूर्ण झाली आणि जेम्स लिकी हा भारतातला पहिला संपादक, पत्रकार. २९ जानेवारी १७८० रोजी त्याने स्वतःचे वृत्तपत्र काढले. आज त्या गोष्टीला पुरी दोनशे वर्षे झाली. पुलाखालून पाणीही बरंच वाहून गेलं आणि खरं तर त्यामुळं जमीनही सुपीक झाली. एक गोष्ट मात्र लक्षणीय आहे ती ही की, भारतात पहिलं वृत्तपत्र परकीयांनी सुरू केलं, पहिला छापखाना परकीयांनीच सुरू केला आणि पहिलं पुस्तकही परकीयांनीच प्रसिद्ध केलं. एवढं असूनही भारतीय पत्रकारितेमधील भारतीयत्व मात्र टिकून राहिलं. अर्थात त्यामागची परंपराही मोठी आहे.

दि. २९ रोजी पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागातर्फे या द्विशताब्दीनिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विषय होता 'पत्रकारितेची २०० वर्षे'. वक्ते होते सर्वश्री बाबासाहेब घोरपडे, आ. रा. भट, यदुनाथ थत्ते आणि अध्यक्षस्थानी होते श्री. माधवराव साने. वक्ते वयाने वृद्ध असले तरी ज्ञानाने व अनुभवाने संपन्न होते. एकही भारतीय तरुण, तडफदार पत्रकार बोलला नाही ही गोष्ट मात्र खटकणारी होती. तसं म्हणायला एक फ्रेंच पत्रकार श्री. मोरादिगी यानी भाषण केलं.

वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख प्रा. ल. ना. गोखले यानी स्वागत आणि प्रास्तविक केल्यानंतर अध्यक्ष श्री. माधवराव साने बोलले. त्यांचं व्यक्तिमत्त्व इतकं भारदस्त आहे की, असं व्यक्तिमत्त्व आजच्या पिढीतल्या पत्रकारांना लाभणं हा अपवादच म्हणावा लागेल. त्यानी एकूण पत्रकारितेचा आढावा घेतला. स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांच्या कामगिरीबद्दल बोलताना ते म्हणाले, '१९२० नंतर लोकजागृतीच्या कार्यात वृत्तपत्रांचा वाटा महत्त्वाचा आहे. त्या वेळी म. गांधीसारखे 'लोकमान्य' पुढारी वृत्तपत्रे चालवीत. गांधीइतकी जिद्द या व्यवसायात फार क्वचित दिसते. 'मी माझ्या वृत्तपत्रात एकही जाहिरात स्वीकारणार नाही!' हे गांधींचं ब्रीद होतं आणि तरीही त्याचं वृत्तपत्र कधीही तोटयात आलं नाही.' (नंतर आ. रा. भट याचं संदर्भात म्हणाले की, गांधींचं उदाहरण देऊन उपयोग नाही. लोक गांधी काय म्हणतात ते वाचण्यासाठी त्यांचं वृत्तपत्र विकत घेत होते; पण गांधींच्या मृत्यूनंतर त्या वृत्तपत्राचा खप इतका कमी झाला की ते बंद करावं लागलं.)

माधवरावांनी आपल्या भाषणात एक धोका सूचित केला. 'वृत्तपत्रसृष्टी हळूहळू भांडवलदारांच्या हातात जात असल्यामुळे याही क्षेत्रात मक्तेदारशाही निर्माण होत आहे. या क्षेत्राची यांत्रिक आणि तांत्रिक प्रगती कल्पनेच्या बाहेर झालेली दिसते. पण ही वाढ दिशाहीन आहे. या वाढीला अजून तरी दिशा सापडत नाही. विकसनशील देशात वृत्तपत्रानी देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणे आवश्य असते. आपल्याकडे याबाबतीत निराशाच पदरी पडते. आपण अजूनही वृत्तवितरणासाठी परकीय भाषांचा अवलंब करतो. हिंदुस्थान समाचार आणि समाचार भारतीसारख्या वृत्तसंस्था याबाबत महत्त्वाचे कार्य करीत आहेत.'

माधवरावाच्या या प्रास्तविकानंतर सकाळचे माजी संपादक श्री. बाबासाहेब घोरपडे बोलले.

ते म्हणाले, 'मी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात वावरलेला पत्रकार आहे, स्वातंत्र्यपूर्वकाळात ध्येयवाद होता, त्याच्या पूर्तीसाठी जिद्द होती. आता पत्रकाराने वृत्तपत्र बदलले की, त्याचे पगाराचे स्केल बदलतात. अर्थात आता 'तेव्हा आम्ही *असं केलं–आता काय!*' *असं म्हणण्यात* अर्थ नाही. काळ बदललाय, नवी आव्हानं पुढे ठाकलीयेत, त्याला सामोरं जायला हवं.'

'पूर्वी पार्सले रेल्वेने जात असत, त्यावेळी तिथल्या पार्सल क्लार्कला डाक एडिशनचा अंक लाच म्हणून आम्ही देत असू' असं एक गंमतीदार उदाहरणही बाबासाहेबांनी दिलं. वृत्तपत्रे आणि समाज यांच्या अन्योन्य संबंधाबाबत मात्र त्यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा माडला. ते म्हणाले, 'आज शिकलेला वर्ग–ज्याला 'बुद्धिजीवी' हे गोंडस नाव दिलं जातं– समाजापासून दूर चालला आहे. जग एवढं पसरलंय की, त्याची या बुद्धिजीवीना कल्पनाही नसते. ते आपल्या कोशातच असतात. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत याचं प्रत्यंतर आलं. वृत्तपत्रात येणारा मजकूर आणि प्रत्यक्षात समाजामध्ये चाललेल्या घडामोडी याचा काही संबंध असायला हवा. या वर्गानं समाजात जास्तीत जास्त मिसळायला पाहिजे.

'या समाजाचं नेतृत्व जर वृत्तपत्रांना करायचं असेल तर समाजातील सगळे स्तर पत्रकारांनी जवळून पहायला हवेत, त्यांना समजावून घ्यायला हवं, त्यांची सुखदुःखं पाहायला हवीत. नेतृत्वाचा वकूब वाढायला हवा.'

*बाबासाहेबांच्या बोलण्यातून त्यांनी* खूप काही पाहिलंय, सोसलंय, अनुभवलंय याची जाणीव होत होती. नव्या जगातील वृत्तपत्रांमधील नव्या गोष्टी मला कळत नाहीत– I am too old to learn new tricks असं म्हणून त्यांनी आपलं भाषण सपवलं.

श्री. आ रा. भट यांनी वृत्तपत्रांच्या आर्थिक स्वातंत्र्यावरच जास्त भर दिला. ते म्हणाले, 'जाहिराती आणि अंकाची किंमत यांचं संतुलन असायला हवं. त्यासाठी पृष्ठ पातळीवर किंमत कोष्टक लागू करणे आवश्यक आहे. अशी तरतूद घटनेच्या ९ व्या परिशिष्टामध्ये करावी म्हणजे कुणालाही ते बेकायदा ठरविता येणार नाही.

'आज नवं वृत्तपत्रं काढणं हे अवघड होऊन बसलंय. कमी पैशात जास्त पानं

मिळाली तर वाचणाराही खूष आणि रद्दी जास्त मिळते म्हणून वाचणारीणही खूष. नवी नवी वृत्तपत्रं निघणं लोकशाहीच्या वाढीच्या दृष्टीने आवश्यक असेल तर पृष्ठ-पातळीवर किंमत कोष्टक आवश्यक आहे.'

'साधनाचे संपादक श्री. यदुनाथ थत्ते यांनी आपल्या या सृष्टीत प्रवेशांचं कारण पहिल्यांदा सांगून टाकलं. वृत्तपत्रं हे अन्याय निवारणाचं साधन आहे म्हणून मी इकडे वळलो. आजच्या वृत्तपत्रसृष्टीबद्दल बोलताना ते म्हणाले, 'आज वृत्तपत्रे प्रबोधनाच्या साधनाऐवजी करमणुकीची साधने बनली आहेत. वृत्तपत्रांमधील प्रबोधनाची शक्ती जवळजवळ संपुष्टात आल्याचे जाणवते. आज आपल्याकडे विशफुल जर्नालिझम सुरू झालाय. या सर्वामुळे आजच्या वृत्तपत्रांना स्वतःचे व्यक्तिमत्त्व नाही. त्यांची आयडेंटिटी संपुष्टात आली आहे.'

ही सगळी भाषणं ऐकत असताना जेम्स लिकी बरोबर वृत्तपत्र सृष्टीतील मानदंड असलेल्या व्यक्तींचं स्मरण होत होतं. नव्या बदलत्या समाज व्यवस्थेचा, परिस्थितीचा, अनुभवांचा वृत्तपत्राच्या माध्यमातून आविष्कार करताना जी विचारांची बैठक त्याच्या मुळाशी असावी लागते ती आज दिसत नाही. औद्योगिकरणाच्या लाटेच्या प्रवाहाला हे क्षेत्र थोपवू शकले नाही. या क्षेत्रात औद्योगिकरणाबरोबरच व्यावसायिकरण झाल्यामुळे होणारे तोटे दर्शनीय नसले तरी त्याचे परिणाम मात्र फार दूरगामी आहेत हे लक्षात घेतलं पाहिजे. जास्त जाहिराती म्हणून किंमत कमी, किंमत कमी म्हणून खप जास्त, खप जास्त म्हणून नफा जास्त, नफा जास्त म्हणून क्षेत्र व्यापक, क्षेत्र व्यापक असल्यामुळे मक्तेदारी-या अशा साखळीत छोट्या वृत्तपत्रानी काय करायचं ? काही ध्येये समोर ठेवून चालविल्या जाणाऱ्या वृत्तपत्रानी, मासिकांनी काय करायचं ? हा प्रश्न बिकट आहे. आज अनेक वृत्तपत्रे या प्रश्नाला कसंबसं तोंड देत तग धरून आहेत. पण हे असं किती दिवस चालणार ! *

## वाचिक अभिनय —डॉ. लागू

अलीकडे डॉ. लागूंचं पुण्यातील वास्तव्य दुर्मिळ होत चाललंय. त्यामुळं जाहीर कार्यक्रमांतून त्यांचं दर्शन होणं हा योगच. पण गेल्या आठवड्यात डॉक्टर एका जाहीर समारंभात बोलले. डॉक्टरांचे विचार नाट्यसृष्टीतल्या नव्या कलाकारांना खूपच अंतर्मुख करायला लावतात. आधी ते जाहीरपणे कमी बोलतात, पण बोलतात ते असं की, ऐकणाऱ्यांना 'हेच ऐकायचं होतं आम्हाला' असं वाटून जातं.

'ड्रॉपर्स' या नाट्यसंस्थेनं एक आंतर-महाविद्यालयीन नाट्यवाचनस्पर्धा आयोजित केली होती. नाट्यवाचन या प्रकाराचं 'ग्लॅमर' महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पाहता प्रतिसाद उत्स्फूर्त, दाद देणारा होता. आजच्या महाविद्यालयीन रंगभूमीवर 'वाचिक अभिनय' हा एक महत्त्वाचा, अर्थपूर्ण भाग असतो, याची जाणीव दिसत नाही. या अभिनयाची जाण वाढावी या उद्देशानं ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेच्या पारितोषिकवितरणासाठी डॉ. श्रीराम लागू आले होते. प्रमख पाहुणे म्हणून निवृत्त हिंदी सिनेनट श्री. डेव्हिड उपस्थित होते. डॉ. लागू 'वाचिक अभिनया'वर बोलणार होते. भालवा केळकर वाचिक अभिनय करून दाखवणार होते एवढा साज जमल्यावर कार्यक्रम रंगण्याची हमीच होती. तसा तो रंगलाही.

भालवांनी आपल्या भाषणात रंगभूमीवरून वाचिक अभिनय हळूहळू लोप पावतो आहे की काय अशी शंका बोलून दाखविली; पण भालवांनी केलेली प्रात्यक्षिके म्हणजे त्यांच्या रंगभूमीवरील समृद्ध अनुभवाचा परिपाक होता. त्यांना जे काही बोलायचं होतं ते त्यांनी या प्रात्यक्षिकाद्वारा अतिशय प्रभावीपणे मांडलं.

श्री. डेव्हिड म्हणजे चित्रपटामधील मूर्तिमंत वात्सल्य. कधी वडील, कधी काका, कधी आजोबा अशा अनेक भूमिकांमधून त्यांचं ते वात्सल्य ओसंडून राहिलंय. ते मराठी चांगलं बोलत असले तरीही त्यांनी इंग्रजीतून छोटसं भाषण केलं. सोबत ४२ वर्षांचा अनुभव त्यांनी आणला होता. शब्दाचं अभिनयातील महत्त्व, शब्दाद्वारे पोचविले जाणारे अनुभव या विषयावर ते बोलले खरे; पण पुण्याबाबत ते म्हणाले की, या कलेची परंपरा असलेल्या ठिकाणी एकही चित्रीकरणाचा स्टुडिओ असू नये ही खेदाची बाब आहे.

डॉ. लागूंनी भाषणाच्या सुरुवातीला मधू लोखंडे याच्या काही आठवणी सांगितल्या. या स्पर्धेत मधू लोखंडे मानचिन्हे देण्यात आली. लागूंचा आवाज ऐकताना आपण एक संगीतमय नाद ऐकत आहोत असं वाटतं. त्याचे शब्द, त्यांचा आवाज यामुळे समोरचा माणूस हरखून जातो. लागू वाचिक अभिनयावर बोलताना म्हणाले, 'नाट्यवाचन हे साध्य नाही तर साधन आहे. पूर्वीच्या काळी याचं भानच नव्हतं. नट भाषणं साभिनय म्हणून दाखवायचा. बस ! या विषयीचा विचार त्या वेळी फारसा झालेला नव्हता; पण आज मात्र आंगिक अभिनयाला महत्त्व देऊनच नाटकं लिहिली जाताहेत. खरं तर वाचेला नाटकातून हद्दपार करणं अशक्य आहे. त्या अनुभवाला फार मर्यादा पडतात.

'शब्दाचा आशय लोकापर्यंत पोचला नाही तर नाटकाचा परिणाम होणार नाही, त्यासाठी शब्दोच्चार चांगले हवेत. हल्ली आवाज 'कमवायला' लागत नाही हे खरं, पण स्वतःच्या आवाजाचा वापर कसा करायचा याचा विचार नटानं केला पाहिजे. शब्दाला अर्थ, नाद, लय असतात. त्यांचा वापर करत आपण आशयाकडं गेलं पाहिजे. त्यासाठी विविधांगानं जगलं पाहिजे, जीवनाला सामोरं गेलं पाहिजे. शब्दामागं त्या नटाचं व्यक्तिमत्त्व उभं असतं, अन्यथा शब्द पोकळच राहतात. त्यासाठी नटाचं व्यक्तिमत्त्व संपन्न असायला हवं. त्यानं खूप वाचायला हवं, ऐकायला हवं, अनंत गोष्टी करायला हव्यात.

'नटानं भूमिकेशी समरस व्हायचं नसतं तर तसा बेमालूम भास निर्माण करायचा असतो. नट म्हणून जे व्रत घेतलंय त्याच्याशी तादात्म्य पावायचं असतं. नाटक म्हणजे डोळे आणि कान यानी केलेला यज्ञ असतो, तर नट त्या यज्ञाच्या वेदीमध्ये जळणाऱ्या समिधा आहेत.'

लागू अगदी नेमकं, मुद्देसूद बोलतात. ते नाटक करत नसले तरी त्यांच्या मनात सतत नाटकं होत असतात. त्यावर विचारमंथन चालू असतं. ते विचार अशा भावनांमधून व्यक्त होतात आणि नाट्यरसिक अंतर्मुख बनतो.

—मुकुंद संगोराम

# रंगभूमी

विनया खडपेकर

# बहिष्कृत

## सामाजिक जाणिवेचा नटका आविष्कार

गॉसिप ग्रुप निर्मित, श्री. विनय आपटे दिग्दर्शित 'बहिष्कृत' या नाटकाचा दुसरा प्रयोग २३ जानेवारी या दिवशी संध्याकाळी साडेसात वाजता 'छबिलदास'-मध्ये सादर झाला. श्री. अरुण साधू यांच्या 'बहिष्कृत' या कादंबरीचे श्री. चंद्रकान्त मेहेंदळे यांनी केलेले हे नाट्यरूपान्तर होते.

एका महार तरुणाचा जातीय अन्यायाविरुद्ध झगडा हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. विदर्भातील रिदगाव नावाच्या आडगावात अकोल्याहून इंगळे महार शिक्षक येतो. गावात महारांना अजून समान वागणूक मिळत नाही. शिक्षकाच्या खोलीतल्या माठाला इंगळेगुरुजी शिवले तर चालत नाही. वर्गात महाराची मुले मागच्या बाकावर बसतात. इंगळे जेथे राहतो त्या महारवाड्यात पिण्याच्या पाण्याची नीट सोय नाही. महारवाड्यासाठी गावातील सवर्णांची विहीर खुली असावी म्हणून इंगळे सत्याग्रह करतो. तो आणि त्याचे सहकारी मारले जातात. शेवटी विहीर खुली झाल्याची दवंडी पिटली जाते.

सुमारे दीड-पावणेदोन तास हे नाटक आपल्याला गुंतवून ठेवते. महारवाडा, देशमुखवाडा, शिक्षकाची खोली, कुलकर्णी मास्तरांचे घर येथील निरनिराळ्या प्रसंगांतून इंगळे गुरुजींचे कथानक पुढे जात राहते. इंगळे गुरुजींच्या या कथानकात शिक्षकांचे आपसातील तणाव दिसतात. दिलदार मनाचे देशमुख दिसतात. महारवाड्यातील जुन्या-नव्या पिढीचे संघर्ष जाणवतात. त्यातून इंगळे गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. यात महारांचा किंवा सवर्णांचा पक्षपात नाही. कोणाची बाजू सांगणारे, कोणाची वकिली करणारे हे कथानक नाही. हे एका खेडेगावातील वस्तुस्थितीचे दर्शन आहे. खेडेगावातील जात-पात प्रकरण स्थूल मानाने जाणवावे असे हे वस्तुस्थितीदर्शन आहे, कथानकात एक ठळक दोष आहे. इंगळे मास्तर अवघ्या चार दिवसांत नेता बनतो, क्रांती करतो ही गोष्ट फार अवास्तव वाटते हा काळ निदान एक वर्षाचा हवा होता.

श्री. अरुण साधू यांच्या कादंबरीशी तुलना करता नाटक कसे वाटते? कादंबरीत एका गावगाड्याचे चित्र आहे.बहिष्कृत महार-समाजाची वेदना आणि जाती जमातीमधील तणाव हा कादंबरीचा मुख्य विषय आहे. नाटकात इंगळेगुरुजींच्या कथानकाला महत्त्व आहे. गावाचे अस्तित्व केवळ पार्श्वभूमी-सारखे आहे. कुलकर्णी मास्तरांच्या मुलीचे प्रकरण, तिच्या मनातील इंगळे गुरुजींबद्दलचा सद्भाव, ती आणि देशमुख लफडे हा कादंबरीतील भाग कादंबरीच्या विषयाच्या दृष्टीने अगदीच अनावश्यक आणि विसंगत आहे. नाटकात हा भाग वगळण्यात श्री. चंद्रकांत मेहेंदळे यांनी योग्य निर्णय घेतला आहे. कादंबरीतील सूक्ष्म मनोदर्शन नाटकात नसले तरी एकंदरीत पाहता कादंबरीच्या विषयाला रंगमंचकावर साकार करण्यात लेखक, दिग्दर्शक, कलाकार यशस्वी झाले आहेत.

नाटकाचा प्रयोग नेटका होतो.

कोणतीही सजावट न करता सरपंच, सगळे शिक्षक, देशमुख यांचे पोषाख, हलणे, बोलणे यातून गावची वातावरणनिर्मिती सहजपणे साधली आहे. श्री. पद्माकर ओझे (इंगळे गुरुजी) आणि श्री. विनय आपटे (देशमुख) यांचा अभिनय विशेष उल्लेखनीय वाटतो. दणदणीत आवाजाचा, दिलदार मनाचा पण गरम डोक्याचा देशमुख श्री. विनय आपटे यांनी सहजपणे उभा केला आहे. त्याचे उठणे–बसणे, विचारी किंवा संतप्त नजरेने पाहणे अशा बारीक–सारीक गोष्टीतून देशमुखांच्या स्वभावाच्या छटा दिसतात आणि देशमुख मूर्तिमंत साकार होतात. किडकिडीत शरीराचा, तळमळीने शिकवणारा, अन्यायाशी झगडणारा इंगळे गुरूजी ठरीव ठशाचा 'हिरो' वाटत नाही, याचे श्रेय श्री. पद्माकर ओझे यांच्या अभिनयास जाते. विहीर खुली करा, म्हणून देशमुखांपुढे एकटाच उभा राहिलेला इंगळे गुरुजी मवाळ, भेदरलेला वाटत नाही किंवा उगीचच छाती पुढे करून बलिदानासाठी तयार असलेला हिरो वाटत नाही. स्वतःच्या तत्त्वाबद्दल खात्री, भोवतालच्या परिस्थितीची जाणीव तरीही मनात कोठे तरी धडधड स्वाभिमान या सर्वाचे संमिश्र भाव इंगळे गुरुजींच्या चेहऱ्यावर होते. सुषमा कुलकर्णी याना मात्र देशमुखाणबाई उभी करण बिलकूल जमले नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला देशमुखीणबाईंना अपेक्षित असा भारदस्तपणा नाही. बोलण्यास उभ राहण्याच्या पद्धतीत खानदानी आब नाही. इंगळे गुरुजींशी स्वतःच्या मुलासारखे प्रेमळ बोलणारी पण त्याने विहीर खुली करण्याची मागणी करताच अस्वस्थ होणारी, चिडणारी तरी शेवटी

मवऱ्याला त्याच्या अंगावर हात टाकू न देणारी अशा या देशमुखिणीच्या मनातील आंदोलने दाखविणे सुषमा कुलकर्णी यांना साधले नाही. त्या फक्त पाठ केलेले संवाद उच्चारतात. प्रयोगातील शेवटशेवटचे एक दृश्य विशेष उल्लेखनीय. पोलिसाकडे काय अर्ज द्यायचा हे देशमुख आपल्या वाड्यावर सरपंचाला सांगत असतात आणि दुसरीकडे इंगळे गुरुजीही चवरला पोलिसाकडे काय अर्ज द्यायचा ते सांगत असतात. एकाच प्रश्नाचा रंग व्यक्तीनुसार कसा बदलतो ते येथे सहजपणे, उचित भावाने दाखविले आहे.

नाटक वेळेवर सुरू होऊन कंटाळा न आणता संपले हे एक विशेषच. हल्ली फार क्वचित् नाटके वेळेवर सुरू होतात. वीस-पंचवीस मिनिटे उशीर बहुतेक नाटकांना होतो. छबिलदास, सामाजिक दंभाविरुद्धची ठरीव पोपटपंची, अर्थहीन कथानके वगैरे पाहून शिणलेल्या मनाला हे नाटक म्हणजे एक दिलासा वाटला. *

# मागोवा

## वेगळे पण ढोबळ आणि उथळ

पडदा वर जाताच समोर दिसले झोपडपट्टीचे दृश्य– तेव्हा वाटले, आता दारूने झिंगलेली माणसे, भरपूर शिव्या, पिळवणुकीबद्दल पोपटपंची वगैरे सगळे बघत वेळ काढायचा. पण तसे घडले नाही. ' मागोवा 'चे लेखक श्री. राजा केळकर यानी काही वेगळे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तो सिद्धीस गेला नाही, पण प्रयत्न केला. नेहमीची पोपटपंची टाळली याचेच कौतुक वाटते.

देवरूख गावच्या गरीब कुटुंबातला राजा हा मुलगा. जत्रेच्या दिवशी कोणी घरात नसताना त्याची बहीण पळविली जाते. नंतर आई मृत्यू पावते. राजा मुंबईला झोपडपट्टीत येतो. त्याची वस्तीत दहशत आहे. पोलिसात वट आहे. बायकांच्या भानगडी न करणारा, उगीचच दंगा न करणारा असा पोलिसात त्याचा लौकिक आहे. गुलाब आपली बहीण आहे अशी शंका येऊन आणि मन्सूरला धडा शिकविण्यासाठी राजा गुलाबला आपल्या घरात आणतो. मन्सूरला ' किंग ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बड्या स्मगलरचा आशीर्वाद आहे. गुलाब किंगच्या मालकीची असल्यामुळे किंग येऊन धमकावतो. राजा बधत नाही–दोघात एक प्रकारे तट होतो. राजा ' किंग 'च्या मदतीने स्मगलिंगच्या व्यवसायात येतो. श्रीमंत होतो. बहिणीचा शोध चालूच. योगायोगाने बहिणीचा प्रियकर राजाचा सेक्रेटरी होतो. एका सत्प्रवृत्त हवालदाराची मुलगी म्हणजेच राजाची बहीण निघते. ती राजाच्या घरी येत असताना किंग तिचा खून करतो. येथे नाटक संपते.

घटनांच्या साखळीचे पारंपारिक कथानक असते तसे हे कथानक आहे. येथे ' राजा 'चा सत्पक्ष आणि ' किंग 'चा खलपक्ष अशी विभागणी केली आहे. राजाची बहीण कोण हे रहस्य शेवटपर्यंत गुप्त ठेवले आहे. त्यामुळे कुतूहल जागे राहून कंटाळा येत नाही आणि नाटक एकंदर ठीक वाटते. तरीही लेखक जे सांगण्यासाठी धडपडत आहे ते मात्र नाटकात पूर्णपणे सांगितले जात नाही. या नाटकात हिंदु व मुस्लिम संघर्षाचे ओझरते दर्शन आहे. सत् आणि असत् या मूलभूत मानवी वृत्तीचा संघर्ष आहे. दारिद्र्य आणि संपत्ती यांच्यातील झगडा आहे. परंतु त्याचे पुरेसे दर्शन नाटकात होत नाही. सुरुवातीचे दोन अंक या संघर्षाचे चित्र दाखवून शेवटी एकदम राजाच्या बहिणीच्या शोधाला महत्त्व आले आहे. कथानकाचा तोल यामुळे बिघडतो. निरनिराळे संघर्ष हा एक तुकडा आणि राजाच्या बहिणीचे कथानक हा दुसरा तुकडा असे घडते. या दोन प्रवाहांना अपेक्षित एकजिनसीत्व नाही. यामुळे नाटक थोडेफार वेगळे असले तरी ढोबळ आणि उथळच वाटते.

नाटकाचा प्रयोग एकंदर ठीक होतो. सुरुवातीला झोपडीचे दृश्य, नंतर राजाचे श्रीमंत घर योग्य प्रकारे दाखवले आहे. ' मैथिली ' निर्मित श्री. बाबा परूळेकर यानी दिग्दर्शित केलेल्या या नाटकात श्री. चंद्रकात वैद्य (राजा), श्री. मनोहर कर्वे ( किंग ) श्री. गौरू दळवी ( हवालदार ), श्री. रमेश भिडे (बादल), श्री. विलास कोसके (वसंत) श्री. राजा केळकर (शरदभैय्या), श्री. विजय पाध्ये ( इन्स्पेक्टर ), श्री. मोहन मानकर (राजू), श्री. पांडुरंग भोईर (मन्सूर), श्री. भास्कर पावसकर (रामू), क्षमा कोसके ( वासंती राणे ) आणि मिस कारमेज ( गुलाब ) यानी आपापल्या भूमिका योग्य केल्या आहेत. □


आवृत्ती संपत आली....

# जनांचा प्रवाह चालिला

लेखक :
विनय हर्डीकर

मूल्य :
वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चित्रपट

सदानंद बोरसे

# हम तेरे आशिक है

## बर्नार्ड शॉच्या त्रस्त समंधा, शांत हो....

टेम्सच्या काठावर जन्मलेली जॉर्ज बर्नार्ड शॉची मानसकन्या आपला एलायझा डूलिट्ल्चा पोषाख बदलून फुलराणी बनून मराठी रंगभूमीवर आणि 'संतू रंगीली' बनून गुजराथी रंगभूमीवर अगदी अलीकडेच भेटली आणि लगेच हिंदी चित्रपटाच्या कथा लेखकांनी तिचे हरण करून टाकले. या हरणानंतर आणि सक्तीच्या स्वयंवरानंतर बिचारीला माहेरचे वडिलांचे नाव सोडून नवीन नावाचे कुंकू तर लावावे लागलेच; पण जाचक सासुरवासाचा भोगही बिचारीच्या नशिबी आला.

हिंदीमध्ये या एकाच कल्पनेवर आधारित दोन चित्रपट होत आहेत; त्यांपैकी एक 'हम तेरे आशिक हैं' नुकताच प्रदर्शित झाला. शॉसाहेबांचा कुठेही उल्लेख न करता त्यांच्या या फेअर लेडीवर हवी तेथे हवी तशी प्लॅस्टिक सर्जरी करून तिचे सौंदर्य हवे तितके किंवा नको इतके विद्रूप करून टाकण्याचा पटकथाकार रामानंद सागर आणि कमलेश्वर यांनी राजरोस परवाना मिळवून टाकला. अत्यंत प्रसन्न, अत्यंत नितळ, अत्यंत भावमुलायम अशा या मूळ प्रेमकथेच्या वेलीवर या दोघांनी अत्यंत बेंगरूळ अशी बांडगुळे लटकवून दिली. मग त्यात एक वर्षानुवर्षे धुमसणाऱ्या वैराचे बांडगुळ आहे, दुसरे कौटुंबिक संघर्ष, खानदान की इज्जत, पोरांची अदलाबदल, खलनायकगिरी, हाणामाऱ्या अशी सर्व बांडगुळे त्या कथावेलीतून सर्व रस शोषून घेऊन मनसोक्त सुजत राहतात. त्यांच्या तडाख्यातून वाचलेल्या आणि मूळ कल्पनेशी थोडाफार इमान राखणाऱ्या काही जागा मात्र छान खुलल्या आहेत आणि बाकीच्या पार्श्वभूमीवर त्या उठूनही दिसतात. उदाहरणार्थ डॉ. आनंदने 'दहा हजार वेळा ए बी सी डी लिही.' असे सांगितल्यानंतर रामकलीने वह्या, खोलीच्या भिंती, छत भरवून टाकणे हा असा एक छान घेतलेला प्रसंग किंवा आयुष्यात पहिल्यांदाच टी. व्ही. हा प्रकार पाहणाऱ्या रामकलीची प्रतिक्रिया हा आणखी एक प्रसंग. पण असे प्रसंग अक्षरशः सहा किंवा सात. बाकी सर्व वेळ 'The day of the Jackal' पासून (रामकली ऊर्फ राजकुमारी संयोगिताला मारण्यासाठी खुनीची नेमणूक, त्याने कलिंगडांवर केलेली नेमबाजी, रामकली वाकल्यामुळे त्याचा नेम हुकणे) ते 'Wait until dark' पर्यंत (रामकली व खुनी यांच्यात शेवटी चाललेला लपंडाव) अनेक ठिकाणांहून पैदा केलेली कलमी बांडगुळे चरत असतात.

पटकथाकार रामानंद सागर आणि कमलेश्वर हेच चित्रपटाचे संवादलेखकही आहेत. काहीही कारण व संबंध नसताना दोघांनी डॉ. आनंद (जितेंद्र) व त्याचे वडील (अमजदखान) यांना समुद्रापलीकडे ब्रिटिश मुलखात धाडून दिले आहे. आता हा अव्यापारेषु व्यापार केल्यानंतर त्यांच्या तोंडी ब्रिटिश संवाद घालणे ओघाने आलेच. रामानंद सागर व कमलेश्वर यांनी लिहिलेले ते धेडगुजरी इंग्रजी संवाद आणि जितेंद्र व अमजद यांनी गलिच्छ गावठी उच्चारात ते म्हणणे म्हणजे चित्रपटातील सर्वात विनोदी भाग. चित्रपटात सुजीतकुमारलाही जॅक्सन बनवून टाकले आहे; पण एकूण त्याचे बोलणे-चालणे पाहून तो बाटगा किरिस्ताव असल्याचे मी ओळखले.

सामान्य कथा वापरून जर चित्रपटाची कलात्मक उंची वाढवायची असेल तर त्यासाठी चित्रपट हाताळणारा दिग्दर्शक तितक्याच ताकदीचा असायला हवा. त्याचप्रमाणे उत्तम कथा वापरून चित्रपट गाळात घालण्यासाठी दिग्दर्शकही तितक्याच नापीक डोक्याचा असायला हवा. 'हम तेरे आशिक हैं'चे दिग्दर्शक आहेत प्रेमसागर. त्यांच्या दिग्दर्शननैपुण्याबद्दल काय लिहावे ? आईच्या फोटोला घातलेला हार भिंतीवरून पाल पडल्याप्रमाणे टपकणे, आईचा आशीर्वाद या समीकरणापलीकडे या गृहस्थाचे दिग्दर्शन अद्याप गेलेले नाही. (अपवाद फक्त आधी उल्लेख केलेल्या काही मोजक्या प्रसंगांचा.)

चित्रपटात संथाळी फुलवाली रामकली आहे हेमामालिनी. ती दिसते छानच. शिवाय रामकली आणि राजकुमारी संयोगिता दोन्ही

नीटस उभ्या करण्याचा तिने प्रयत्न केला आहे. आता हा बदल घडतो, एवढेच चित्रपटात सांगितले आहे. तो कसा घडतो, ही क्रिया ( जी ' My fair lady ' आणि ' ती फुलराणी 'चे ठळक वैशिष्टय होती ) प्रत्यक्ष पडद्यावर दाखविण्याला फाटा दिला आहे; पण हा हेमामालिनीचा दोष नाही. शिवाय तिची कुवत, आवाका यांचे भान असल्याने उगाचच तिच्या आणि ऑड्रे हेपबर्नच्या कामांची तुलना करून मी हेमामालिनीचा सन्मान करू इच्छीत नाही. सगळ्या कलाकारांमध्ये सर्वाधिक त्रास दिला तो ओम शिवपुरीने. पडद्यावर असताना दर दीड सेकंदाने एकदा एक मोठी आरोळी ठोकून ही व्यक्ती पळून जाणे वा उड्या मारणे वा तत्सम उद्योग करीत राहते. बाकीच्यामध्ये फक्त डॉ. श्रीराम लागू व केश्तो मुकर्जी उल्लेखनीय.

चित्रपटाचे गीतकार आहेत साहिर. चित्रपटातील ' मार लिया मैदान। कैसा रहा पलान ( = plan ) ? अपना बढिया रहा पलान। ' या दर्जाची शब्दजुळणी पाहता साहिर व साहिर लुधियानवी एकच की वेगवेगळे अशी शंका मनात येऊ लागली आहे. चित्रपटाचे संगीतकार रवींद्र जैन. आशा भोसले यांनी गायलेले ' ता घिन् ता घिन् तिनक घिन् ता घिन् घिन् ' हे एकमेव गीत श्रवणीय.

चित्रपट पाहिल्यावर सारखा एकच विचार मनात घोळत होता, ' बर्नार्ड शॉच्या त्रस्त समंधा, शांत हो ! ' *

# जालिम

' आपल्या प्रेयसीवर झालेल्या खुनाच्या आरोपातून तिची सुटका करणाऱ्या व जालिम गुन्हेगारांना शोधणाऱ्या साहसी हिरोची ॲक्शनपॅक्ड कथा ' असली जेम्स बाँड टाइप जाहिरात असलेला चित्रपट असला की हमखास ओळखावे, यात हिरो सोडून दुसरा जो साळसूद, सद्गुणी भला माणूस असेल; तोच शेवटी चित्रपटातील सर्व खून व बलात्कार करणारा, सर्व हिरे पळविणारा, सर्व अपघात घडवून आणणारा आणि शेवटी या दुसऱ्यासाठी खणलेल्या खड्ड्यात स्वतः जाऊन पडणारा खलनायक निघणार. बाकी लोक आपली थातुरमातुर चिल्ली-पिल्ली आणि लिंबूटिंबू असतात.

दिग्दर्शक वी. सुभाष याचा ' जालिम ' चित्रपट सुरू होऊन पाच–दहा मिनिटे झाली, एक खून पडला आणि तोपर्यंत मदनपुरीभोवती तयार झालेले संशयाचे वातावरण आणि प्राणचा अतिचागुलपणा पाहून मी ताबडतोब प्राणच खलनायक असल्याची मनात खूणगाठ बाधून टाकली आणि ही अटकळ अगदी बरोबर निघाली. चित्रपटाच्या सुरुवातीलाच ओळखलेल्या या रहस्याचा पुन्हा एकदा फुसका स्फोट करण्यासाठी मग संपूर्ण चित्रपटात मिळून दोन-तीन खरे, दोन-तीन खोटे खून, एक बलात्काराचा प्रयत्न, दोन-तीन चोऱ्या, दोन-तीन पाठलाग, दोन-तीन हाणामाऱ्या, एक प्रेम आणि तीन-चार गाणी घातली आहेत. चित्रपटातील प्रेमप्रकरण, अत्यंत अनावश्यक नाचगाणी, कौटुंबिक संघर्ष, ' गुन्हेगारी प्रवृत्तीला कारणीभूत असलेली सामाजिक परिस्थिती, आंधळा न्याय ' इत्यादी विषयांवरील नाटकी तात्विक चर्चा अशा अनेकविध ठिगळाच्या गोधडीखाली आधीच नखाएवढा जीव असलेले ते बिचारे रहस्य पार गुदमरून गेले आहे.

चित्रपटाचा नायक प्रकाश. ही भूमिका केली आहे विनोद खन्नाने. आपल्या मजबूत हाडापेरामुळे त्याने केलेल्या हाणामाऱ्या फक्त मस्त वाटतात, ज्योतीचे काम केलेली लीना चंदावरकर म्हणजे गोड, पण मठ्ठ चेहऱ्याचे लठ्ठ पिंप. प्राणचे संपूर्ण काम म्हणजे अतिरेकी अतिनाट्याचा नमुना होता.

चित्रपटाचे संगीतकार लक्ष्मीकांत–प्यारेलाल. गाणे पडद्यावर पाहताना वा ऐकताना त्याला संगीत ऐकत आहोत असे, वाटू न देण्याची आणि ते संपताक्षणीच प्रेक्षकही ते विसरून जाईल अशी चोख व्यवस्था करण्याची खुबी त्यांनी मोठ्या हुशारीने दाखवली आहे.

□


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

## सप्रेम नमस्कार....

मला वाटते आपल्या शंकेचे निरसन झाले असावे. आणखी काही प्रश्न असल्यास अवश्य विचारावे. शास्त्रीय विचारसरणीचा प्रसार व्हावा हाच माझ्या लेखामागील हेतू आहे. त्यात मोरारजींची टिंगल करण्याचा हेतू नाही. त्यांच्या गुणाबद्दल मलाही योग्य तो आदर आहेच.

३० जानेवारी ८० डॉ. शरद अभ्यंकर
वाई

◻ आजच्या (२ फेब्रुआरी) माणूसच्या अंकातील श्री. मिलिंद कोकजे यांचे पत्र वाचले: आजच्या युवक अंधःश्रद्धा, सत्यनारायणपूजा, बुवाबाजी, हुंडापद्धती खर्चिक लग्नसमारंभ इत्यादी गोष्टीत बंडखोरी करीत नाही. याचा दोष त्या युवकाकडे नसून त्यांच्या पालकवर्गाकडे आहे, असे श्री. कोकजे याचे म्हणणे दिसते. त्यांच्या विचाराशी मी सहमत आहे.

आज्ञाधारक हा एक मुलांना नेभळट बनविणारा गुण आहे. खरे म्हणजे पालकांनी मुलाना आज्ञाभंगाचे शिक्षण लहानपणापासून द्यावयास पाहिजे. म्हणजे मग पहा मोठेपणी ती कशी बंडखोर निपजतील ! – मोठ्यांची, शिक्षकांची, वरिष्ठांची, शासनाची सामाजिक, नीतिबंधनाची कुणाचीच आज्ञा ती पाळणार नाहीत. मुलगा / मुलगी 'आमच्या आज्ञेत' आहेत याचा पालकांनी कसला अभिमान बाळगावयाचा ? – खरे म्हणजे ती कुणालाच जुमानीत नाहीत, या गोष्टीचा पालकांना अभिमान वाटावयास पाहिजे. संघात म्हणे हे आज्ञापालन अतिशय कठोरपणाने शिकविले जाते. केवळ एवढ्याच गोष्टीमुळे संघावर सांप्रत जो सर्व बाजूंनी टीकेचा भडिमार होत आहे तो योग्यच आहे असे मला वाटते !

प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे आजचा तरुण अर्थहीन रूढी आणि परंपरा यांच्याविरुद्ध बंड करून उठू शकत नाही असे जे श्री. कोकजे म्हणतात तेही बरोबरच आहे. आजचा युवक काय आणि कोणी काय प्रतिकूल परिस्थितीत कोण कसे काय बंड करणार ? बंड करावयास परिस्थिती तशी अनुकूल आणि सुखावह असावयास पाहिजे ! खरे म्हणजे या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीचा दोष (श्री. कोकजे यांनी तसे म्हटले नसले तरी) पालकांनाच द्यावयास पाहिजे. मुलाना जन्म तर द्यावयाचा; परंतु त्यांच्यासाठी आर्थिक सुबत्ता निर्माण करून ठेवावयाचे उत्तरदायित्व टाळावयाचे ही पालकांची काय तऱ्हा झाली ? ती वयात येण्यापूर्वी त्यांचे संसार उभे करण्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र (Self-contained) फ्लॅट्स् घेऊन ठेवा. त्याना सुखासीनपणे जगता येईल इतपत संपत्ती आणि बँक–शिल्लक त्यांच्या नावे करून ठेवा आणि मग पहा घातक रूढी, अर्थहीन परंपरा, अंधश्रद्धा, बुवाबाजी इत्यादींची बंधने ती कशी तडातड तोडतात ! काय गोष्ट आहे महाराजा ! फुले, आगरकर, कर्वे (दोघेही – 'धों. के.' आणि 'र. धो.) सावरकर इत्यादी रूढिभंजकांचे आत्मे त्यांच्याकडे तोंडात बोटे घालून अचंब्याने पहात राहतील !

'थोडक्यासाठी कुणाला कशाला दुखवा' असा जो विचार सांप्रतची पिढी करते, तोही योग्यच आहे; खरे म्हणजे आपल्या सुखासीनतेत ज्यांच्यामुळे किंचित देखील उणीव निर्माण होते, असे कोणतेच कृत्य माणसाने करू नये. आता वर उल्लेखिलेले समाजसुधारक आपापल्यापरीने कदाचित थोर असतीलसुद्धा; परंतु तत्कालीन प्रतिष्ठितांना आणि सनातन्यांना आपल्या बंडखोरीने दुखविले हे त्यांचे चुकलेच !

– तेव्हा रूढी, परंपरा मोडण्याचे काम 'पालका'चे आहे, असे जे श्री. कोकजे म्हणतात ते खरेच आहे. 'बालकां'चे ते काम नव्हे !

२ फेब्रुवारी, ८०. भा. आ. भोळे,
पुणे


तीन राजहंस प्रकाशने

**आणि ड्रॅगन जागा झाला**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**मॅक्झिम गॉर्की**

लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : दहा रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

# आवाहन

**रा. स्व. संघापासून स्फूर्ती घेऊन काही मंडळींनी मध्यप्रदेशात चांपा येथे कुष्ठनिवारणाचे कार्य गेली काही वर्षे नेटाने व विलक्षण जिद्दीने चालविलेले आहे. हे कार्य यंदाच्या अभूतपूर्व दुष्काळामुळे आज संकटात सापडलेले आहे. या संकटावर मात करण्यासाठी ....**

अवेळी आणि नावापुरतं पडलेलं पावसाचं पाणी दुष्काळाची पेरणी करून गेलं आणि केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या मध्य प्रदेशातील छत्तीसगढ ह्या भागात दुष्काळानं हाहाःकार उडवून दिला. नक्षत्रासारखी नक्षत्रं कोरडी ठणठणीत गेली. पावसाच्या काळजीनं धरणीच्या काळजाला तडे गेले. ज्यानी ह्या भागातील पूर्वीचे दुष्काळ पाहिले आणि अनुभवले होते असे वयस्कर निक्षून सांगू लागले की, गेल्या कित्येक वर्षांत असा दुष्काळ त्यांनी कधी पाहिला वा अनुभवला नव्हता ! सांगणारे खरं तेच सांगून गेले की, ' पुरानं दुथडी भरून वाहणाऱ्या नदीच्या पाण्यापेक्षा कोरड्या ठणठणीत नदीचं पाणी माणसाला जास्त तडफडून ठार मारतं आणि म्हणूनच की काय इथल्या अविकसित खेड्यातील गरीब शेतकऱ्याचे आणि गावकऱ्यांचे तांड्याच्या तांडे पोटासाठी दशदिशा मोकाट सुटले आणि खेडीपाडी ओस पडू लागली. वीतभर पोटाच्या टीचभर खळगीला लागणाऱ्या मूठभर अन्नाच्या उद्याच्या घासासाठी स्वतःच्या पाठीवर वा पुडलिकाप्रमाणं कावडीत प्रपंचाची गाठोडी बाधून दूर-वर अदृश्य होत जाणाऱ्या त्या अभागी शेतकऱ्यांच्या 'कारव्यांकडे' पाहिले की वाटायचं, अशा दुःखातसुद्धा ते अभागी जीव सुखी आहेत, स्थलातर करून का होईना पुढच्या पावसाळ्यापर्यंत ते आपली कशी-बशी गुजराण तरी करू शकतील; पण... मुक्या गुराढोरांसह आणि अपंग आणि उपेक्षित बेसहारा कुष्ठ–रुग्णासह आम्ही आमचा 'कारवाँ' घेऊन जाणार तरी कुठं ? कारण दुःखी कुष्ठ–रूग्णांचा उदरनिर्वाह आमच्या आश्रमावर अवलंबून, आश्रम शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून, शेतीचं उत्पन्न पावसाच्या पाण्यावर अवलंबून आणि पावसानं तर दगा दिला! आमचा 'कारवाँ स्थलांतर करणार तरी कसं ? पण...

पण...हताश कुष्ठ-रुग्णांना दैवी निर्धारानं साथ दिली आणि निधड्या छातीनं अपंग कुष्ठ-रुग्णांनी शेतात नांगर धरले. रात्रीचे दिवस झाले आणि भगीरथ प्रयत्नांच्या गंगोत्रीनं भू मातेला गहिवर आला आणि काय सांगावं, इथल्या परिसरात आमच्या आश्रमाच्या उभ्या शेतीकडे पाहून अपंग कुष्ठ-रुग्णाच्या श्रमाला जाणाऱ्या-येणाऱ्याची दृष्ट लागण्याची पाळी आली. नेहमी जेवढी तांदळाची पोती हाती लागत त्याच्या निम्म्याहून जरी कमी पोती हाती लागली तरी ती तुटपुजी 'दौलत' पोत्यात बांधताना आणि बैलगाडीवर चढवताना आश्रमवासी कुष्ठ-रुग्णांचा आनंद गगनात मावेनासा झाला. पहिल्या पावसाच्या सरीनं पुलकित झालेल्या मातीचा सुगंध जसा साऱ्या वातावरणात भिनून जातो ना, अगदी तसाच आमच्या आश्रमाचा सारा परिसर त्यांच्या अभूतपूर्व आनंद-वर्षावाच्या सुगंधानं दरवळू गेला ! तरी पण...

तरी पण अपंग कुष्ठ-रुग्णांच्या अर्ध्याहून अधिक तांदळाच्या पोत्याबरोबरच, दुष्काळानं त्यांचं इतर धान्यही त्यांच्यापासून हिरावून नेलं! आणि दुष्काळात 'तेरावा' म्हणूनच की काय तेल-मिरची-मसाल्यापासून ते कपडालत्त्यापर्यंत सर्वच वस्तूंच्या किमतीनी उच्चांक गाठले ! पैसे वारेमाप फेकूनसुद्धा औषधे दुर्मिळ झाली ! अकस्मात व अकल्पित प्रसंगामध्ये वज्राघाताने एखादा प्रापंचिक ज्याप्रमाणे पगाराच्या दिवशी भांबावून जातो त्याप्रमाणे ह्या अभूतपूर्व दुष्काळाच्या वज्राघातानं आम्ही सर्व कार्यकर्ते भांबावून गेलो आहोत. कुष्ठ-रुग्णांना लागणाऱ्या दैनंदिन गरजेच्या वस्तूची भयानक त्रुटी पुढच्या पावसाळ्यापर्यंत भरून कशी निघणार ही आमची विवंचना आहे. म्हणूनच सर्व प्रकारच्या त्रुटीच्या पूर्ततेसाठी आश्रमवासी कुष्ठ-रुग्णांच्या वतीनं हे 'आवाहन' करीत आहोत. विश्वास आहे की आतापर्यंत मिळत गेलेला सर्वांचा निरपेक्ष सहयोग या वेळी लाभेल. □